# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १३९) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.२८ मे २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## महाविकास आघाडी विधान परिषदेच्या १७ जागा लढवणार, जागावाटपावर दोन दिवसात अंतिम निर्णय

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधान परिषदेवर निवडून द्यायच्या १६ जागा व नागपूरच्या एका जागेवरील पोटनिवडणूक अशा सर्व १७ जागा महाविकास आघाडी लढवणार आहे. यासाठी जागावाटपाची प्राथमिक चर्चा आज टिळक भवनमध्ये खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. दोन दिवसात पुन्हा एक बैठक घेऊ आणि सर्वसंमतीने जागा वाटपाचा निर्णय जाहीर करु, अशी माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे. विधान परिषद निवडणुकीच्या जागा वाटपासाठी काँग्रेस पक्षाचे मुख्यालय टिळक भवन येथे महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक पार पडली. या बैठकीत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे (श.प.) प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार सुप्रिया सुळे, शिवसेनेचे नेते आमदार अनिल परब, अंबादास दानवे, मिलिंद नार्वेकर उपस्थित होते. बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, भाजपा लोकशाही मानत नाही, त्यांनी निवडणुकीत घोडेबाजार मांडला आहे, 'पैसा फेक तमाशा देख'चा दुसरा अंक सुरु झाला असून ५ लाख रुपये आगाऊ देऊन नगरसेवकांची पळवापळवी केली जात आहे, अशा परिस्थितीत लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी महाविकास आघाडी एकजूटपणे विधान परिषदेची निवडणूक लढवणार आहे. मविआमध्ये जागा वाटपावरून कोणताही विसंवाद अथवा तिढा नाही तर सुसंवाद आहे, तर दुसरीकडे गँग्ज ऑफ ट्रिपल इंजिन सरकारमध्येच जागा वाटपावरून धुसफुस सुरु आहे, असेही सपकाळ म्हणाले.

# ऊस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांची केंद्र सरकारकडून दखल-मुख्यमंत्री

## केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्याशी राज्याच्या प्रतिनिधींची सविस्तर चर्चा



नवी दिल्ली दि.२७ (वृत्तसंस्था)- साखरेच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करणे, इथेनॉल कोटा वाढवणे, कर्ज पुनर्गठन, व्याज सवलत, शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी, शेतीमालाचे ग्रेडिंग, कांदा बियाण्यांवर अधिभार आदी शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्यासोबत झालल्या सकारात्मक चर्चेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून याबाबत लवकरच केंद्र सरकार अनुकूल निर्णय घेणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

नवी दिल्ली येथे महाराष्ट्रातील साखर कारखानदारी, ऊस आणि कांदा उत्पादक शेतकरी यांच्या विविध अडचणींसंदर्भात केंद्रीय सहकार मंत्री शाह यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्री आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींची चर्चा झाली.

साखरेच्या प्रश्नांवर केंद्रीय सहकार मंत्र्यांसोबत अत्यंत सकारात्मक चर्चा झाल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, साखरेची किमान आधारभूत किंमत वाढवणे गरजेचे असल्याचे केंद्रीय मंत्री शाह यांनी मान्य केले आहे. इथेनॉलचा कोटा मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी येत्या दोन महिन्यांत निर्णय घेण्याबाबत त्यांनी सहमती दर्शवली असून कर्ज पुनर्गठनासंदर्भात राज्य शासनासोबत एकत्रितपणे काम करून मार्ग काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यासह व्याज सवलतीचे (इंटरेस्ट सबव्हेंशन) पैसे तात्काळ देण्याचे मान्य करण्यात आले आहे. 'क्वेल प्राइजिंग' (किंमत नियंत्रण) संदर्भात केंद्राने एक प्रस्ताव मागवला असून, राज्य शासनाकडून तो तयार केला आहे व लवकरच सादर केला जाईल. या प्रकल्पामुळे साखर कारखानदारीचे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवरही सकारात्मक निर्णय झाले असल्याची माहिती देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाफेड आणि एनसीसीएफने सुरू केलेली कांदा खरेदी बाजारात थेट व्यापाऱ्यांकडून न होता, थेट शेतकऱ्यांकडून केली पाहिजे ही मागणी मान्य करण्यात आली आहे. २ लाख टनांऐवजी १० लाख टन कांदा खरेदी नाफेड आणि एनसीसीएफने करावी, यावर सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा आहे. सध्या कांद्याचे बियाणे मोठ्या प्रमाणात निर्यात होत असल्याने देशांतर्गत कांद्याला एक्सपोर्ट मार्केट उरत नाही. यासाठी कांदा बियाण्यावर मोठ्या प्रमाणात 'एक्सपोर्ट सरचार्ज' लावला पाहिजे, ही मागणी देखील मान्य करण्यात आली आहे. तसेच कांद्याचा खरेदी भाव नुकताच वाढवून १५ रुपये ८० पैसे करण्यात आला आहे. तो आणखी कसा वाढवता येईल यावर चर्चा झाली. कांद्याच्या बियाणांवर निर्बंध असले, तरी कांद्याच्या निर्यातीवर (कांदा पाठवण्यावर) कोणतीही बंदी नाही, असे या चर्चेत स्पष्ट करण्यात आले.

नाफेड किंवा एनसीसीएफमध्ये ग्रेडिंगच्या नावाखाली माल निकृष्ट दर्जाचा दाखवून खरेदी नाकारली जाते, अशी शेतकऱ्यांची तक्रार असते. यावर उपाय म्हणून आता यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून ग्रेडिंग केले जाईल, ज्यामुळे शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळणार असल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आंबा आणि हापूस आंब्यासंदर्भात निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनाही यावेळी निवेदन देण्यात आले. विमा कंपन्यांनी घातलेल्या जाचक अटींमध्ये बदल केल्यास आंबा उत्पादकांना मोठा दिलासा मिळू शकतो, हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. यावर केंद्रीय मंत्र्यांनी विमा कंपन्यांची बैठक घेऊन योग्य मार्ग काढण्याचे आश्वासन दिले असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

# नरेंद्र मोदी पनौती आहेत, हर्षवर्धन सपकाळांची मोदींवर पुन्हा टीका

## वारकऱ्यांना मतदार याद्यांमधून वगळण्याचा भाजप-आयोगाचा घाट असल्याचा आरोप

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- ''पंतप्रधान नरेंद्र मोदी पनौती आहेत'', अशी टीका पुन्हा एकदा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मोदींवर केली. सपकाळ यांनी दलिंदर या शब्दाचे स्पष्टीकरण देत पनौती शब्द वापरून पुन्हा मोदींवर टीकास्त्र सोडले. महाविकास आघाडीच्या नेत्यांची विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठक पार पडली. या बैठकीनंतर सपकाळ यांनी टिळक भवन, मुंबई येथे माध्यमांशी संवाद साधला. यावेळी सपकाळ यांनी आषाढी कार्तिकेच्या वेळेत होणाऱ्या एसआयआर प्रक्रियेवरही सवाल उपस्थित केला.

एसआयआरसाठी निश्चित करण्यात आलेल्या आषाढी वारीच्या कालखंडावरुन हर्षवर्धन सपकाळ यांनी निवडणूक आयोग आणि भाजपावर टीका केली. ''या कालखंडात (एसआयआर) महाराष्ट्रात मोठा उत्सव असतो, वारकऱ्यांना मतदार याद्यांमधून वगळण्यासाठी, भक्तांना वगळण्यासाठी भाजपाने आयोगाशी संगनमताने हा घाट घातला आहे'', असा आरोप सपकाळ यांनी केला. तसेच, हा घाट यशस्वी होऊ देणार नाही, असेही सपकाळ म्हणाले.

कांदाप्रश्नावरुन काल (मंगळवारी) तीन तास रस्ता जाम केल्याचे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ म्हणाले. ''या आंदोलनात राष्ट्रवादी (शरद पवार) चे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, रोहित पवार, अंबादास दानवेही होते. या आंदोलनानंतर राज्य सरकारच्या अर्ध्या मंत्रिमंडळाला दिल्लीला जावे लागत आहे. ही विरोधी पक्ष, शेतकरी आणि जनतेची ताकद असल्याचे सपकाळ म्हणाले. कालच्या चमत्कारामुळेच त्यांना दिल्लीत नमस्कार घालावा लागत आहे, पण, दिल्लीतून हात रिकामा घेऊन माघारी घेऊ नका'', असा सज्जड दम सपकाळ यांनी दिला.

''मी कोणताही चुकीचा शब्द वापरलेला नाही. दलिंदर हा लक्षण दर्शवणारा शब्द आहे. दारिद्र्य हा संस्कृत शब्द बोली भाषेत दलिंदर होतो. मोदी सत्तेत आल्यापासून शेतकऱ्यांना भाव नाही, बेरोजगारी वाढली आहे. महिलांवरील अत्याचार वाढले आहेत, भ्रष्टाचार बोकाळला आहे त्या अर्थाने त्या शब्दाचा वापर केला'', असे स्पष्टीकरण सपकाळ यांनी दिले. तसेच, ''संस्कृतमधील शब्द भाजपाला खटकला असेल तर, नरेंद्र मोदी हे पनौती आहेत, असा पुनरुच्चार मी करतो'', अशी टीका सपकाळांनी केली.

## शरद पवार पुन्हा रुग्णालयात दाखल

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख आणि राज्यातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या वृत्तामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असले तरी, प्राथमिक माहितीनुसार काळजी करण्यासारखी कोणतीही परिस्थिती नसल्याचे सांगण्यात येत आहे. नियमित वैद्यकीय तपासणीसाठीच शरद पवार रुग्णालयात दाखल झाल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्या काही महत्त्वाच्या चाचण्या सध्या सुरू आहेत. वाढते वय, सततचा प्रवास आणि राजकीय तसेच सामाजिक कार्यक्रमांमधील व्यस्त दिनक्रम लक्षात घेता डॉक्टरांनी नियमित आरोग्य तपासणीचा सल्ला दिला होता.

## '...तर ही परिस्थिती आणखी चिघळेल'; शेतकरी आंदोलनावरून शरद पवार गटाचा सरकारला इशारा

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)-राज्यातील शेतकऱ्यांवर अन्याय झाला, तर महाराष्ट्रात सरकार विरोधात मोठे वातावरण निर्माण होईल. आम्ही केलेल्या आंदोलनाचे पडसाद सरकारला उमटले आहेत. मुख्यमंत्री आंदोलनांना राजकीय स्टंट म्हणत असतील, तर विरोधकांना रस्त्यावर उतरावे लागते, यासाठी सरकारच जबाबदार आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी मुंबईत बोलताना म्हटले. 'राज्यात कांद्याला योग्य भाव मिळावा आणि निर्यात धोरणात सुधारणा व्हावी या मागणीसाठी महाविकास आघाडीने राज्यभर आक्रमक आंदोलन छेडले आहे. नाशिक जिल्ह्यातील चांदवड, तसेच संभाजीनगर, जुन्नर आणि ओतुर या कांदा उत्पादक पट्ट्यांमध्ये रास्ता रोको, मोर्चे आणि निदर्शने करण्यात आली. आंदोलनादरम्यान अनेक कार्यकर्ते आणि शेतकऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. मे २०२६ मध्ये चांदवड येथे झालेल्या मोठ्या आंदोलनात महाविकास आघाडीच्या नेत्यांनी कांद्याला प्रति क्विंटल ३ हजार रुपये हमीभाव देण्याची प्रमुख मागणी केली,' असे शशिकांत शिंदे म्हणाले.

शशिकांत शिंदे पुढे म्हणाले, 'कालपर्यंत काँग्रेसवर दिल्लीहून निर्णय घेतात अशी टीका करणारे आता स्वतः दिल्लीकडे धावत आहेत. महाराष्ट्राच्या प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी राज्यातील नेत्यांमध्येच वजन असायला पाहिजे. कांदा, ऊस आणि साखरेच्या प्रश्नावर बैठकीसाठी दिल्लीला जावे लागत असेल, तर महाराष्ट्राची भूमिका सक्षमपणे मांडली जात नाही असेच दिसते. राज्यातील शेतकऱ्यांवर अन्याय झाला, तर महाराष्ट्रात मोठे वातावरण निर्माण होईल.

आम्ही केलेल्या आंदोलनाचे पडसाद सरकारला उमटले आहेत. मुख्यमंत्री आंदोलनांना 'राजकीय स्टंट' म्हणत असतील, तर विरोधकांना रस्त्यावर उतरावे लागते, यासाठी सरकारच जबाबदार आहे. आंदोलनामुळेच कांदा प्रश्नाची व्याप्ती वाढली आणि सरकारला दिल्ली दरबारी जाऊन शेतकऱ्यांसाठी भूमिका मांडावी लागली असे ते म्हणाले.

# हर्षवर्धन सपकाळ यांना राज्यात फिरू देणार नाही

## चंद्रशेखर बावनकुळे यांचा इशारा

नागपूर दि.२७ (प्रतिनिधी)- काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात अत्यंत अश्लाघ्य शब्दांत टीका केली आहे. त्यातून त्यांची नीच प्रवृत्ती दिसून येते. त्यांनी आपली भाषा सुधारली नाही, तर भाजप कार्यकर्ते त्यांना महाराष्ट्रात कुठेही फिरू देणार नाहीत, असा इशारा भाजप नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे. यावेळी त्यांनी महायुतीच्या विधानपरिषद निवडणुकीच्या जागावाटपाची घोषणा उद्या किंवा परवा होईल असेही सांगितले.

विरोधी पक्षांनी मंगळवारी चांदवड येथे शेतकऱ्यांचा मोर्चा आयोजित केला होता. यावेळी भाषण करताना हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अत्यंत तिखट शब्दांत आगपाखड केली होती. चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात बोलताना त्यांच्या या टीकेचा समाचार घेतला. ते म्हणाले, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविषयी केलेली टिप्पणी अत्यंत अश्लिल आहे. त्यातून हर्षवर्धन सपकाळ यांची नीच प्रवृत्ती दिसून येते. त्यांची बुद्धी बुद्धीहिन झाली आहे.

विरोधी बाकावर असल्यामुळे सपकाळांचा भ्रमनिरास झाला आहे. त्यामुळे अशी विधाने करून ते गावागावात व समाजात तेढ निर्माण करणे, वाद निर्माण करणे व समाजातील चांगले वातावरण खराब करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी असे विधान करून खूप मोठी चूक केली आहे. भाजपचा कार्यकर्ता हर्षवर्धन सपकाळ यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही. ते सुधारले नाही तर त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करणे सोडले पाहिजे. त्यांनी चांगल्या भाषेत बोलले पाहिजे. त्यांची नीच व नालायक टीकेला आम्ही सोडणार नाही.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमधील वादग्रस्त घटनाक्रमावरही भाष्य केले. ते म्हणाले, राष्ट्रवादीच्या बैठकीत सुनील तटकरे व छगन भुजबळ यांच्यात वाद झाला असेल असे मला वाटत नाही. छगन भुजबळ काल रात्री उशिरापर्यंत माझ्यासोबत होते. त्यामुळे वाद झाल्याची बातमी तुमच्याकडे कुठून आली हे मला माहिती नाही, असे ते म्हणाले.

## राष्ट्रवादीच्या बैठकीत सुनील तटकरेंनी मनातील खदखद सुनावली

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेसची मंगळवारी देवगिरी बंगल्यावर पार पडलेली बैठक अत्यंत वादळी ठरली. गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये 'साईडलाईन' झालेले सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल हे दोघेच या बैठकीत चर्चेचा विषय ठरले. या बैठकीला प्रफुल पटेल यांनी मुंबईत असूनही दांडी मारली. तर प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे या बैठकीसाठी आले पण त्यांनी यावेळी सुनावलेल्या कठोर शब्दांमुळे त्यांची आणि छगन भुजबळ यांची जुंपल्याची माहिती समोर येत आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण होऊ दिले नाही आणि राष्ट्रवादी पक्ष ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप सातत्याने होतो. या पार्श्वभूमीवर सुनील तटकरे यांनी कालच्या बैठकीत आपल्या मनातील सगळी खदखद सुनेत्रा पवार यांच्यासमोर बोलून दाखवली. अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सुनेत्रा पवारांच्या हातात देणे, पक्ष एकसंघ ठेवणे यात मी आणि प्रफुल पटेल यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मात्र, त्यानंतर उद्भवलेल्या स्थितीमध्ये आमच्या दोघांवर टीका सुरु असताना पक्षाचा एकही आमदार अथवा नेता आमच्या बचावासाठी पुढे आला नाही. याशिवाय, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या मुद्यावरुनही मी आणि पटेल दोघेच टीकेच्या तोफेच्या तोंडी गेलो. त्यावेळीही राष्ट्रवादी काँग्रेसमधील कोणीही पुढे येऊन आमची बाजू मांडण्याचा किंवा बचाव करण्याचा प्रयत्न केला नाही, असे सुनील तटकरे यांनी म्हटले.

केवळ प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांनीच टीकेचे धनी का व्हायचे? वरिष्ठ नेतृत्व याबाबत (पान ४ वर)

## जनगणना कामावर असलेल्या महिला शिक्षकाचा अपघाती मृत्यू; राज्यात आत्तापर्यंत ४ ठार

पुणे दि.२७ (प्रतिनिधी)- सध्या शाळांना उन्हाळ्याची सुट्टी लागली असतानाही शिक्षकांची शाळा सुरुच असल्याचं दिसून येत आहे. यंदा उन्हाळ्याच्या सुट्टीत शिक्षकांना जणगनणेचं काम कराव लागत असल्याने भरउन्हात दारोदारी भटंकती होत आहे. त्यातच, कामाच्या तणावाने काही शिक्षकांमध्ये नाराजीचा सूरही पाहायला मिळत आहे. दरम्यान, राज्यात जनगणना कामी असलेल्या तीन शिक्षकांचा मृत्यू झाल्याची दु:खद घटना घडली होती. आता, आणखी एका शिक्षिकेचा अपघाती मृत्यू झाल्याचे समोर आलं आहे. मावळ तालुक्यात जनगणनेच्या शासकीय कामासाठी जात असताना एका शिक्षिकेचा भीषण अपघातात मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना कान्हे फाटा येथे घडली आहे. या घटनेनंतर शिक्षक संघटनांनी पुन्हा एकदा जनगणना कामी प्रशासनाविरुद्ध संताप व्यक्त केला आहे.

दीपाली तांबे असे मृत शिक्षिकेचे नाव असून जुना पुणे-मुंबई महामार्गावरील कान्हे फाटा (पान ४ वर)

## नीट पेपरफुटी प्रकरणात तेरावी अटक; पुण्यातील आणखी काही जण रडारवर

पुणे दि.२७ (प्रतिनिधी)- देशभर गाजत असलेल्या 'नीट' पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातील खासगी 'नीट' मार्गदर्शन वर्गातील शिक्षक हर्षद शहा, तसेच लातूरमधील डॉ. मनोज शिरुरे यांना अटक केली. नीट' पेपरफुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार प्रा. पी. व्ही. कुलकर्णी याला अटक करण्यात आली होती. लातूरमधील डॉ. मनोज शिरुरे यांनी कुलकर्णी यांच्याकडून रसायनशास्त्राचे प्रश्न मिळविले होते. डॉ. शिरुरे यांची या प्रकरणात 'सीबीआय'कडून चौकशी करण्यात आली होती. त्याानंतर डॉ. शिरुरे यांना 'सीबीआय'ने अटक केली.

''नीट' पेपरफुटी प्रकरणात आतापर्यंत १३ जणांना अटक करण्यात आली. डॉ. शिरुरे हे मूळचे लातूरचे आहेत. 'नीट २०२६' पेपरफुटी प्रकरण उघडकीस आल्यानंतर 'सीबीआय'ने तपास सुरू केला. यापूर्वी या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या प्रा. कुलकर्णी यांच्याकडून डॉ. शिरुरे यांनी रसायनशास्त्राचे प्रश्न मिळवले होते. हे प्रश्न आणि अचूक उत्तरे डॉ. शिरुरे यांनी लातूरमधील एका शिकवणी वर्ग चालकाच्या मुलासह तीन विद्यार्थ्यांना दिले होते. तपासात ही बाब उघडकीस आल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली', अशी माहिती 'सीबीआय'ने दिली.

'पुण्यातील शिवाजीनगर भागात असलेल्या एका खासगी शिकवणी वर्गातील भौतिकशास्त्राचे शिक्षक तेजस हर्षदकुमार शहा यांना अटक करण्यात आली. पेपरफुटी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या शिक्षिका मनीषा हवालदार यांनी शहा यांना भौतिकशास्त्राचे प्रश्न आणि अचूक उत्तरे दिली होती. हवालदार यांची चौकशी करण्यात आली. त्यानंतर शहा यांना अटक करण्यात आली', अशी माहिती 'सीबीआय'मधील अधिकाऱ्यांनी दिली.

## ऑनलाइन गेमिंग म्हणजे 'जुगार'च!

### सर्वोच्च न्यायालयाचा कंपन्यांना मोठा झटका

नवी दिल्ली दि.२७ (वृत्तसंस्था)- ऑनलाइन गेमिंग कंपन्यांना मोठा कायदेशीर झटका देत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारचा २८ टक्के वस्तू आणि सेवा कर पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याचा निर्णय घटनात्मकदृष्ट्या वैध ठरवला आहे. न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, ऑनलाइन गेमिंग प्लॅटफॉर्म हे केवळ मध्यस्थ नसून ते प्रत्यक्ष पुरवठादार आहेत. डिजिटल व्यासपीठांवर अनिश्चित निकालांवर पैसे लावून खेळले जाणारे फॅन्टसी स्पोर्ट्स आणि अन्य ऑनलाइन खेळ हे जीएसटी चौकटीत 'सट्टा' आणि 'जुगार' या श्रेणीत मोडतात; त्यामुळे ते कर रचनेच्या कक्षेत येतात.

सर्वोच्च न्यायालयाने सट्टा आणि जुगारातून निर्माण होणाऱ्या दाव्यांवरील जीएसटी आकारणी वैध ठरवताना स्पष्ट केले की, ही कर आकारणी संविधानातील कलम ३६६(१२) आणि ३६६(१२अ) चे उल्लंघन करत (पान ४ वर)

# एसआयआर मोहीमेला असंवैधानिक ठरवता येणार नाही

## सुप्रीम कोर्टाचा महत्त्वाचा निकाल

नवी दिल्ली दि.२७ (वृत्तसंस्था)- पश्चिम बंगालसह पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीवेळी वादग्रस्त आणि प्रचंड चर्चेचा विषय ठरलेल्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण अर्थात एसआयआर मोहीम वैध असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने यासंदर्भात बुधवारी महत्त्वपूर्ण निकाल सुनावला. यावेळी खंडपीठाने आपले निरीक्षण नोंदवताना म्हटले की, निवडणूक आयोगाने आपल्या अधिकाराचा वापर केला आहे. आपल्या अधिकाराच्या कक्षेबाहेर त्यांनी काहीही केलेले नाही. त्यामुळे एसआयआर मोहीमेला असंवैधानिक ठरवता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाने एसआयआर संदर्भातील याचिकांवर सुनावणी झाल्यानंतर यासंदर्भातील निर्णय राखून ठेवला होता. या निकालात सर्वोच्च न्यायालयाने एसआयआर मोहीम वैध असल्याचा निकाल दिला. या प्रक्रियेला चुकीचे ठरवता येणार नाही. मतदार याद्यांचा फेरआढावा घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. लोकप्रतिनिधी कायदा १९५० नुसार हा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. विशेष मतदार यादी पुर्ननिरीक्षण करण्याचे आणि सगळ्या मतदार याद्यांचे पुनरावलोकन करण्याचे अधिकार घटनेने दिले आहेत. संविधानातील निवडणूक आयोगाशी संबंधित कलमांमध्ये अनुच्छेदात लिहलं आहे, निवडणूक आयोग मतदार यादी तयार करेल आणि तिची फेररचना करेल. त्यामुळे एसआयआर मोहीम वैध ठरते, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले.

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने या राज्यात एसआयआर मोहीम राबवली होती. त्यामध्ये निवडणूक यादीतील जवळपास ९० लाख मतदारांना वगळण्यात आले होते. या निर्णयानंतर प्रचंड गदारोळ झाला होता. निवडणूक यादीतून नावं वगळण्यात आलेल्यांमध्ये बहुतांश मुस्लीम मतदारांचा समावेश असल्याचा आणि हे जाणीवपूर्वक केल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. यापैकी काही मतदारांना पुन्हा मतदार यादीत पुन्हा सामावून घेण्यात आले होते.

मात्र, हे प्रमाण अत्यंत नगण्य होते. यामुळे पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावर प्रभाव पडल्याचा आरोप विरोधकांनी केला होता.

## केरळचे माजी सीएम पी. विजयन यांच्यावर ईडीची छापेमारी

तिरूअनंतपुरम दि.२७ (वृत्तसंस्था)- केरळमधील तिरुवनंतपुरम येथे माजी मुख्यमंत्री पी. विजयन यांच्या निवासस्थानी छापा टाकण्यासाठी आलेल्या अंमलबंदी संचालनालयाच्या (ईडी) पथकावर विजयन यांच्या समर्थकांनी हल्ला केला. १२ सदस्यीय पथकाने आज बेकरी जंक्शन येथील विजयन यांच्या निवासस्थानी छापा टाकला. त्यांच्या मुलीच्या एक्झालॉजिक सोल्युशन्स या आयटी कंपनीशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात हे छापे टाकण्यात आले. हे प्रकरण कोचीन मिनरल्स अँड रुटाइल लिमिटेड (सीएमआरएल) द्वारे केलेल्या मनी लॉंड्रिंगशी संबंधित आहे.

ईडीचा तपास रद्द करण्याची मागणी कंपनीने केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी, मंगळवारी केरळ उच्च न्यायालयाने सीएमआरएलची याचिका फेटाळली. ईडीने या प्रकरणात २०२४ मध्ये गुन्हा दाखल केला होता. सीएमआरएल नावाच्या कंपनीने २०१८-१९ दरम्यान विजयन यांची मुलगी टी. वीणा यांच्या एक्झालॉजिक सोल्युशन्स या आयटी कंपनीला १.७२ कोटी (पान ४ वर)

# ‘सागरा प्राण तळमळला’

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी लिहिलेल्या ’ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला’ या गाण्याची शताब्दी झाल्यात्यानिमित्त पुण्याचे स्वामी माधवानंद यांनी केलेले ‘ने मजसी ने’ या सुप्रसिद्ध कवितेचे रसग्रहण.

‘मोठया गौरवाने गावं असं हे गीत आपण अनेकदा ऐकलं आहे. त्याच्या शब्दांतून जी वेदना प्रगट होते ती जाणून घेऊन ते शब्द ऐकले पाहिजेत. असं झालेलं नाही, की सावरकर सहज साईट सिइंगला ब्रायटनच्या समुद्रतीरी गेले आणि एकदम त्यांना गीत स्फुरलं वेदनदेखील कशामुळे होती ती परिस्थिती कळली पाहिजे की काय घडत आलं होतं आणि काय मोडत होतं !

हे सर्व ऐन तारूण्यातले मोठे उत्साही आणि बुध्दिमान देशभक्त होते. एकदा सावरकरांना लंडनमधील प्रसिध्द वृत्तपत्राच्या प्रतिनिधिने विचारलं होतं, की तुमच्यावर सतत लक्ष ठेवलं जातं, तुमच्या मागे सतत पोलिसांची नजर असते ते तुम्हाला कसं वाटतं? त्यावर सावरकर म्हणाले, ‘ We don’t mind. They may follow us if the atmosphere suits them ! ' टिपिकल ब्रिटिश विनोद म्हणून त्यांच्या या उदगाराचं कौतुक झालं होतं. घ्ह्ग्र प्दले हे कार्याचे केंद्र. तिथलं वातावरण तर अत्यंत भारलेलं होतं. हा मदनलाल धिंग्रा, सावरकर स्वतः सेनापती बापट हे सगळे त्यावेळेला रसरसते तारूण्य आणि देशप्रमाचं वारं डोक्यात घेऊन वावरणारे स्फूर्तिशील युवक होते. सेनापती बापट यांचा घातलेला वृध्दपणीचा फोटोच आम्ही नेहमी पाहत आलो आहोत. लहानपणापासून ते तसे दिसत नव्हते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप एवढी पडत असे, की त्यांची एक फ्रेंच मैत्रीण जिला त्यांनी फ्रेंच भाषेतलं बॉम्बस्फोटाचं लिटरेचर ट्रान्सलेट करून द्यायची रिक्वेस्ट केली होती. तिने आपली परीक्षा बाजूला ठेवून - ड्रॉप घेऊन प्रथम ते इंग्लिशमध्ये भाषांतरित करून दिलं. त्याच्या प्रती काढून सावरकरांनी भारतातल्या क्रांतीकारकांना पाठवल्या. त्याचाच उपयोग पुढचे बॉम्बस्फोट केले गेले. लंडनमध्ये देखील ‘पारतंत्र्यात राहणं मान्य नसणं हा गुन्हा नसून गौरवाची गोष्ट आहे’ असा मतप्रवाह होता. अनेक क्रातिकारकांचं ते कार्यस्थळ होतं. रशियन क्रांतीची सूत्रे देखील तेथूनच हलत होती. हिंदुस्थानातल्या तरूणांच्या कार्याचा प्रभाव वाढत होता.

हे सर्व क्रांतिकार्य देशाबाहेरून चाललं होतं. इटलीला स्वातंत्र्य मिळवून देर्णायांत सिंहाचा वाटा असलेल्या मॅझेनीचं आत्मचरित्र सावरकरांनी भाषांतरित करून भारतात पाठवलं होतं. त्याची सावरकरांच्या भाषेतली प्रस्तावना एवढी तेजस्वी आणि प्रेरणादायी होती, की ब्रिटिश सरकारला भीती वाटली आणि तिच्यावर बंदी आणली. अर्थातच ती जास्त प्रसिध्द झाली. सावरकरांना लोकमान्य टिळकांनी पुरस्कृत करून लंडनला पाठवल होतं. टिळक आणि सावरकर दोघांच्या बुध्दिमत्तेबद्दल तिथे आदर होता. बॅरिस्टरची परीक्षा पास होऊन पदवी दिली न गेलेला तरूण म्हणून सावरकरांबद्दल सहानुभूती होती. याचवेळी मदनलाल धिंग्राने कर्झन वायलीला गोळ्या घालून मारल्यामुळे सर्व लोकमत सावरकर आणि सहकारी यांच्या विरूध्द गेलं. बाबाराव सावरकरांकडे बॉम्बस्फोटाच्या साहित्याची भाषांतरित प्रत सापडली होती. इतर आरोपांसह त्यांना जन्मठेपेची सजा दिली गेली. मदनलालच्या निषेधाला सावरकरांनी विरोध केल्याने सर्वांच्या नजरा त्यांच्यावर केंद्रित झाल्या. भारतातल्या क्रांतिकार्यात सुसूत्रता आणून त्याची सूत्रे लंडनमधून हलविण्याची शक्यता मोडून पडली. लंडनमधील कार्य उदध्वस्त होण्याची वेळ आली.

घर मोडकळीला आल्याचा - दोघं भाऊ पकडले गेल्याचा - धक्का होताच. माणूस क्रांतिकारी म्हणून जन्माला येत नाही तो क्रांतीकारी बनतो. घरावर राष्ट्राच्या नावाने बेल तुळस वाहून हे लोक बाहेर पडले तरी प्रेम जिवंतच असतं ही माणसं सामान्य नव्हती. एवढया मोठया सत्तेशी ते थोडेच लोक झुंज घेत होते. अख्खा समाज तुमच्या बाजूने असला तरी तो तुमच्या बाजूने उभा राहत नाही. त्याला उभं करायचं आणि त्याचवेळेला एकाकी झुंजायचं असं अवघड काम ते करीत होते.

कुटुंबाची वाताहत, कार्य उदध्वस्त होण्याची वेळ येऊन ठेपणं आणि स्वतः शंभर टक्के पकडले जाणार आहोत हे कळणं यातून अक्षरशः पळून जाऊन ते त्या ब्रायटनच्या किर्नायावर बसले होते. पकडलो गेलो तर परत भारतात पाठवतीलच असं सांगता येत नाही हा अत्यंत अस्वस्थ करणारा विचार आणि समोर सागर. तो मध्ये आहे म्हणून जाऊ शकत नाही. या भावनेतून ते शब्द आले - ‘ने मजसी ने परत मातृभूमीला’ जणू काही ते त्यांचा सगळा भावनिक आघात सागरावर करीत आहेत.

## देशाची शान

वि.दा. सावरकर देशाची शान
देश त्यांच्यासाठी जीव की प्राण
भारत मातेची मुक्ती हाच असे खरा धर्म
देश स्वातंत्र्यसाठी देश निष्ठा हेच कर्म
स्वातंत्र्य साठी लढा स्वातंत्र्याची ललकारी
वि.दा. सावरकरांची स्वातंत्र्यासाठी भरारी
इंग्रज राजवटीची होती देशात काळी छाया
अन्याया विरुद्ध लढ्याचा रचला त्यांनी पाया
भारताच्या मुक्ततेसाठी स्वातंत्र्याचा लढा महान
देश स्वातंत्र्यात उतरले वीर भारतीय जवान
भारत मातेची मुक्तता देशाला
स्वातंत्र्यता वि.दा. सावरकरांची
यातच खरी महानता
अभिवादन त्यांच्या स्मृतींना करू या
राष्ट्रबळकटीसाठी एकत्रित येऊ या

**- धोंडीरामसिंह राजपूत**

## निवडणूक आचारसंहिता : दि.१ जून रोजीचा लोकशाही दिन रद्द

छत्रपती संभाजीनगर, दि. २६ (प्रतिनिधी) - दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन घेण्यात येतो. दि.१ जून रोजी जून महिन्याचा पहिला सोमवार येत आहे. तथापि, विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या निवडणूकीची आदर्श आचार संहिता जारी असल्याने सोमवार दि.१ जून रोजी होणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन होणार नाही,असे उपजिल्हाधिकारी (सामान्य शाखा) श्रीमती संगिता राठोड यांनी कळविले आहे.

# क्रांतिकारकांचे कुलपुरूष- वि.दा. सावरकर



**हिंदुस्थान** हा बलाढ्य क्रांतिकारकांचा देश आहे. या क्रांतिकारकांनी ब्रिटीशांच्या अन्यायी राजवटीविरूद्ध हसत हसत भारत मातेच्या मुक्ततेसाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. देश वासीयांच्या मनात हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाची राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रभक्ती व राष्ट्रीय लढवैय्येवृत्ती जागृत केली. हिंदुस्थानला अन्याय अत्याचाराविरूद्ध लढण्याची फार मोठी परंपरा आहे. त्या परंपरेचा धागा धरूनच भारतीय क्रांतिकारकांनी भारत मातेच्या मुक्ततेसाठी लढा दिला. न्यायी मार्गाने विनंती व प्रार्थना करून जेव्हा प्रश्न सुटत नव्हता तेव्हा भारतीय क्रांतिकारकांनी आपल्या राष्ट्रनिष्ठा परंपरेचा क्रांतीचा मार्ग स्वीकारून भारत मातेच्या मुक्ततेसाठी क्रांतीकारक प्रयत्न केले व क्रांतिम ार्गाची मुहूर्तमेढ रोवल्या गेली.

क्रांतीलढ्यात हजारो युवकांनी उडी घेतली व अन्यायी अत्याचारी ब्रिटीश राजवटीला दे माय धरणी ठाय करून सोडले. अशा या क्रांतिकारकाचे कुलपुरूष होते वीर वि.दा. सावरकर, वीर सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ रोजी झाला. ज्या स्वातंत्र्यविरांची देदिप्यमान रत्नमाला महाराष्टाने भारत मातेच्या गळ्यात घातली तिच्यातले आद्यरत्न श्री. शिवाजी महाराज होते तर अखेरचे रत्न वीर सावरकर होते. किंबहुना असे वाटते की शिव छत्रपतींनी भारताची पारतंत्र्यातून मुक्तता करण्यासाठी वीर सावरकरांच्या रूपाने पुन्हा या महाराष्ट्रात अवतार घेतला की काय? पारतंत्र्य आणि गुलामगिरी या दोन बाबी वीर सावरकरांना असह्य होत स्वतःच्या देशामध्ये गुलामगिरी हे त्यांना मान्य नव्हते. स्वातंत्र्यता ही राष्ट्राची नाडी असते आणि या स्वातंत्र्यासाठी प्राण गेला तरी चालेल पण भारताच्या मुक्ततेसाठी लढा द्यायलाच हवा हा विचार त्यांच्या म नात खोलवर रूजला होता. त्यासाठी त्यांनी संपूर्ण विश्वाच्या इतिहासाचा अभ्यास करून क्रांतिविरांचे विविध मार्ग जाणून घेतले. भारतीय शौर्याचा आणि पराक्रमाचा वारसा घेवून सावरकर जन्माला आले होते. सत्तावनच्या स्वातंत्र्य लढ्याची ज्वाला अजूनही धगधगत होती. वासुदेव बळवंतांच्या आत्मयज्ञाच्या वातावरणामध्येच सावरकरांचा जन्म झाला होता. देशबांधवाचा राक्षसी छळ करणाऱ्या उन्मत इंग्रज अधिकाऱ्यांचा बळी घेवून चाफेकर बंधू फासावर चढले होते. त्यांच्या प्राण ज्योतीने चेतवलेले यज्ञकुंड एकसारखे भडकवीत ठेवणे हे आपले कर्तव्य आहे असा वीर सावरकरांना साक्षात्कार झाला. आपल्या घरातील अष्टभुजा देवीपुढे त्यांनी शपथ घेतली की, देशाचे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी सशस्त्र क्रांतिचा केतू उभारून ती मारता मारता मरे तोवर झुंजेन ! वयाच्या चौदाव्या वर्षी मृत्यूला आव्हान देण्याची प्रतिज्ञा सावरकरांनी केली आणि ती विलक्षण रीतीने खरी करून दाखविली. अशा या महान क्रांतिकारकांचे देशकार्य, देशप्रेम प्रत्येक भारतीयांना राष्ट्रप्रेमाची आजही जाणीव करून देत आहे. सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने जाण्याची प्रतिज्ञा करून सावरकर थांबले नाहीत तर परकीय राज्यकर्त्यांविषयी त्वेष व पारतंत्र्याबद्दल चीड या भावनांची आग त्यांनी तरूणांच्या हृदयामध्ये पेटविली व त्यांना भारत मातेच्या मुक्ततेसाठी लढा देण्यास सज्ज केले. वयाच्या पंचवीसाव्या वर्षी सावरकर भारताच्या सशस्त्र क्रांतिचे एकमेव सुत्रधार बनले. वीर सावरकरांच्या जीवनाचा संग्राम त्यांच्या वयाच्या तेवीसाव्या वर्षापासून तो त्यांच्या वयाच्या त्र्याऐंशीव्या वर्षापर्यंत अखंड साठ वर्षे चालला होता. आपली मातृभूमी परकीयांच्या जाचातून मुक्त व्हावी म्हणून त्यांनी जन्मापासून जणू प्राणयज्ञच आरंभलेला होता. या यज्ञात त्यांनी आपल्या तारूण्याची संसाराची, घरादाराची, शरीराची, सुखाची आहुती दिली ती भारतमातेच्या मुक्ततेसाठी. स्वदेशावर प्रेम करणारे अनेक देशभक्त आज जगात आहेत परंतु वीर सावरकरासारखे दुमिळंच कारण त्यांनी देशासाठी अनन्वित यातना सहन केल्या. प्राणातिक अग्नि दिव्यातून ते गेले. मृत्यूला ही ज्यांनी परतवले असे वीर सावरकर एक अव्दितीय महापुरूष होते यात शंका नाही. अन्याय अत्याचार झाले मात्र त्यांनी त्याविरूद्ध क्रोधाचा किंवा व्देषाचा एकशब्दही काढला नाही. यातच त्यांचे श्रेष्ठत्व व स्थितपूज्ञत्व समावलेले आहे. देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी केलेल्या आत्यंतिक बलिदानाची ही अम रकहानी होय.. महान ध्येयासाठी राष्ट्रनिष्ठेसाठी सहन केलेल्या खडतर यातनाही अखेर तिरस्कारणीय नव्हे तर प्रेमळ व आकर्षकच वाटतात. सावरकरांसारख्या देशभक्त वीरांचे रक्तबिंदू ज्या भूमीवर सांडले ते अंदम ानचे काळेपाणी सुद्धा सावकरांच्या सहवासामुळे पवित्र तीर्थासारखे वाटू लागले.

सावरकरांचे व्यक्तिमत्त्व असाम ान्य व अलौकिक होते त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचे दोन पैलू भारतीय जनता कदापीही विसरणार नाही ते दोन पैलू म्हणजे अपरंपार देशभक्ती आणि परमोत्कट स्वातंत्र्य लालसा. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जन्मच मुळात देशभक्तीमधून झाला. वीर सावरकर जन्माला आले तेव्हापासून देशभक्त आहेत व शेवटपर्यंत ते देशभक्तच राहिले. अशा देशभक्तीची आज देशाला गरज आहे व अशा देशभक्तांची या महान व विशाल देशाला आत्यंतिक निकड आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवन कार्य व जीवन चरित्रापासून भारतीयांनी प्रेरणा घेवून आजच्या स्थितीत प्रत्येक भारतीयांच्या मनात प्रखर देशभक्ती निर्माण व्हावी अशी अपेक्षा आहे.

वीर सावरकर म्हणजे भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासामधील एक तेजस्वी पर्वच आहे. वीर सावरकरांचे साहित्य म्हणजे देशभक्तीचे धगधगते अग्निकुंड होय. मराठी साहित्यामध्ये असे कोणतेही क्षेत्र नाही की, ज्यामध्ये सावरकरांनी लिहिले नाही. कथा, कादंबरी, नाट्य, निबंध काव्य या साऱ्या क्षेत्रात त्यांनी लेखणी चालविली. त्यांच्या वाणी आणि लेखणीमधून ज्वाला आणि ठिणग्या खेरीज व राष्ट्रप्रेमाखेरीज दुसरे काहीच बाहेर पडले नाही. सारा देश अन्यायाविरूद्ध पेटविण्याची क्षमता त्यांच्या लेखणीमध्ये आहे. वीर सावरकरांनी लिहिलेले साहित्य आजही आमच्यात राष्ट्रप्रेमाविषयी राष्ट्रनिष्टेविषयी जागृकता निर्माण करणारे आहे. सावरकरांचा पिंड जरी क्रांतिकारकाचा असला तरी ते आधुनिक काळातील भारताचे एक म हान बुद्धीवादी विचारवंत व तत्वज्ञानी म्हणून गणल्या जातात. भारतीय स्वातंत्र्य संग्रामाला आंतरराष्ट्रीय स्वरूप देणारे सावरकर हे पहिले क्रांतिकारक होते म्हणून भारतीय क्रांतिकारकाचे मुकुटमणी त्यांना म्हटल्या जाते.

भारताच्या सशस्त्र क्रांतीचे वीर सावरकर हे पाया असून नेताजी सुभाषचंद्र हे तिचा कळस होत. एकोणीसशे सत्तेचाळीस साली भारत स्वतंत्र झाला याचे श्रेय गांधींना आणि टिळकांना आहे तसे वीर सावरकर यांनाही आहे. स्वातंत्र्याचा मुहूर्त मेढ रोवणाऱ्या व क्रांतीकारकाचे कुलपुरूष असणाऱ्या वीर सावरकर या देदिप्यमान त्यांच्या स्मृतींना कोटी कोटी प्रमाणे.

**- धोंडिरामसिंह राजपूत**

## सावरकरांची हिंदूत्वाची व्याख्या

हिंदू तो, की जो सिंधूपासून समुद्रापर्यंत पसरलेल्या या आसिंधुसिंधुपर्यंतची भूमीला आपली पितृ मानतो त्याचप्रमाणें वैदिक सप्तसिंधूच्या प्रदेशांत ज्या जातीच्या प्रारंभाचा पहिला आणि दृश्य असा पुरावा मिळतो व ज्या जातीने नवीन प्रदेश आक्रमीत पुढे जात असतां ज्याचा स्वीकार केला ते ते सर्व आपल्यांत समाविष्ट केले आणि जे जे समाविष्ट केले ते परमोत्कर्षाला पोचविले व जी जाती पुढे हिंदू जाती या नावाने प्रसिद्ध पावली, त्या जातीचे रक्त हिंदू या नांवास पात्र होर्णाया मनुष्याच्या अंगांत खेळत असते.

समान इतिहास, समान वायय, समान कला, एकच निर्बंध-विधान, एकच धर्मव्यवहारशास्त्र, सामायिक यात्रा महोत्सव, समाईक धार्मिक आचार विधी, समाईक सण आणि समाईक संस्कार, एवं गुणविशिष्ट अशी जी त्या महानब हिंदू जातीची संस्कृती त्या संस्कृतीचा वार साज्याला परंपरेने मिळालेला असतो, आणि या सर्वांपेक्षा ज्यामध्ये त्याचे तत्तवद्रष्ट ऋषी मुनी, संतमहंत, गुरु आणि अवतारी पुरुष जन्माला आले आणि ज्यामध्ये त्याची पुण्यकारक अशी यात्रास्थळें आहेत असे असिंधु सिंधू भारत ज्याची पितृभूमी आणि पुण्यभूमी आहे तो हिंदू ! हीच ती हिंदुत्वा ची आवश्यक लक्षणे: समान राष्ट्र, समान जाती नि समान संस्कृती. ही सर्व लक्षणे थोडक्यांत अशी सांगतां येतील की, हिंदू तो की जो या भूमीला नुसती पितृभूच नव्हे तर पुण्यभूहि मानतो. कारण हिंदुत्वाची पहिली जी दोन प्रमुख लक्षणे, राष्ट्र आणि जाती ही स्पष्टप णें पितृभू या शब्दाने दाखविली जातात. तर हिंदुत्वाचे तिसरे लक्षण जी संस्कृती ती प्रामुख्याने पुण्यभू या शब्दांत प्रतीत होते. कारण संस्कृतीमध्येच धार्मिक आचार-विधी नि संस्कार यांचा अंतर्भाव होतो आणि त्यामुळेच ही भूमी आपणाला पुण्यूभू होऊन राहते. हीच हिंदुत्वाची व्याख्या अधिक सुटसुटीत करण्याकरिता, ती पुढील अनुष्टुपांत ग्रथित करण्याचा आम्ही प्रयत्न केला तर तो वायगा ठरणार नाही अशी आम्हाला आशा आहे.

**आसिंधुसिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका ।**
**पितृभूः पुण्यभूश्चैव व वै हिंदुरितिस्मृतः ।।**

सिंधू (ब्रह्मपुत्रेलाही तिच्या उपनद्यांसह सिंधू म्हणतात) पासून सिंधू (समुद्र) पर्यंत पसरलेली ही भारतभूमी ज्याची पितृभू (पूर्वजांची भूमी) आणि पुण्यभूमी (धर्मासह संस्कृतीची भूमी) आहे तो हिंदू !!

# स्वातंत्र्यवीर सावरकर महान देशभक्त

सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ साली नाशिक जिल्ह्यातील भागुर येथे झाला. सावरकरांच्या मनात जन्मापासूनच देशभक्तीची भावना ज्वालामुखी सारखी धकधकत होती आणि जसे-जसे सावरकर मोठे होत गेले तसतशी स्वातंत्र्यासाठी मशाल प्रज्वलित होत होती.विर सावरकरांनी लाला लजपतराय,बाळ गंगाधर टिळक व विपिन चंद्र पाल या महान क्रांतिकारक महापुरुषांपासुन प्रेरणा घेऊन आपली वाटचाल सुरू केली आणि क्रांतीचा लढा सुरू ठेवला व कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता भारताला स्वतंत्र मिळावे यासाठी स्वतंत्र लढ्याच्या कुंडात उडी घेतली.१८५७ च्या गनिमी संघर्षाच्या विद्रोहाचा अभ्यास केला.त्यावर आधारित एक पुस्तक लिहिले’ द हिस्ट्री ऑफ व वॉर ऑफ इंडियन इंडिपेंडन्स’ नावाच्या या पूस्तकाने इंग्रज प्रशासनाचे धाबे दणाणले. त्यामुळे हे पुस्तक इंग्रजांनी बेकायदेशीर ठरविले.परंतु सावरकरांच्या गनिमी काव्याने बिहारमध्ये हे पुस्तक लोकप्रिय झाले आणि स्वातंत्र्याची ज्वाला धकधकायला लागली.सावरकर आणि त्याचा भाऊ गणेश यांनी भारतीय परिषद कायदा १९०९ च्या विरोधात निदर्शने केली.यावर इंग्रजांनी त्यांना गुन्हेगार ठरविले व अटक वॉरंट जारी केला अटक होवू नये म्हणून सावरकर पॅरिसला गेले.नंतर १९१० मध्ये सावरकरांना इंग्रजांनी पकडले व न्यायालयाने त्यांना दोषी ठरवुन ५० वर्षाची शिक्षा ठोठावली. ४ जुलै १९११ ला काळ्या पाण्याची शिक्षा जाहीर झाली व अंदमान आणि निकोबार येथील सेल्युलर जेलमध्ये टाकण्यात आले. तेथे त्यांच्यावर इंग्रजांकडुन सतत अत्याचार होत होते. परंतु त्यांनी स्वातंत्र्य लढ्याचा धीर सोडला नाही आणि अनेक यातना सहन करीत इंग्रजांना बजाऊन सांगितले की मी जिवंत आहे तोपर्यंत देश स्वतंत्र झालेला आपल्याला दिसेल व आपल्याला भारत सोडून जावे लागेल आणि हे सावरकरांनी सिद्ध करून दाखविले ही महानता सावरकरांमध्ये दिसून येते.सध्याच्या परिस्थितीत देशातील काही राजकीय पुढारी महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह, विद्वेषक व चिथावणी देणारे विधान करतांना दिसतात.ही बाब अत्यंत घृणास्पद व निंदनीय आहे. देशाच्या इतिहासात सावरकरांना स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर असे संबोधले जाते.म्हणजेच स्वातंत्र्यवीर ही पदवी पारतंत्र्यातील देशभक्तांनीच दिली ही बाब आक्षेपार्हय विधान करर्णाया राजकीय पुर्ढायांनी लक्षात ठेवली पाहिजे. स्वातंत्रपुर्वकाळ अत्यंत खडतर आणि कठीण होता हे सर्वांनाच ठाऊक आहे.त्याकाळी स्वातंत्रवीर सावरकरांच संपूर्ण कुटुंब स्वतंत्र लढ्यात सहभागी होते.म हाराष्ट्रात अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष,साधु-संत, समाजसुधारक होवून गेले त्यामुळे महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात प्रत्येक तळागाळातील व्यक्तींनी आपले वेगवेगळ्या पध्दतीने योगदान दिले आहे. तेव्हाच भारत स्वतंत्र झाला.इंग्रजांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले.परंतु देशाला स्वातंत्र्य करण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपल्या जिवाची पर्वा न करता हसत-हसत फासावर सुध्दा चढले ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.सावरकरांचा काळ कसा होता किंवा त्यांनी स्वातंत्र्य लढा कसा उभारला ही बाब त्याकाळातील सहर्कायांना व देशभक्तांनाच ग्यात असावी.परंतु आता सावरकरांच्या कर्तृत्ववावर कोणी राजकीय पुढारी चीखलफेक करीत असेल व आक्षेपार्ह विधान करीत असेल हे योग्य नाही असे मला वाटते.स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना झालेली काळ्यापाण्याची सजा आणि त्यांनी भोगलेल्या यातना यांचा इतिहास संपूर्ण शालेय पुस्तकांमध्ये लिखित आहे आणि हि शालेय पुस्तके आजची नसुन ७७ वर्षे जुनी आहे.या संपूर्ण पुस्तकांम ध्ये अनेक विचारवंतांनी, थोरपुरूशांनी सावरकरांच्या कामाची प्रशंसा सुध्दा केली आहे. तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी मिळाली व स्वातंत्रवीर सावरकर नावाने संबोधले जावु लागले. राजकीय पुर्ढायांनी लक्षात ठेवले पाहिजे की स्वातंत्र्यवीर ही पदवी कोणालाही सहज मिळत नाही त्यासाठी त्याग करावा लागतो आणि सावरकरांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी मिळाली व भारत स्वतंत्र झाला ही बाब त्यांच्यावर टीका करर्णायांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्याकाळी अनेक उतार चढाव होते यात दुमत नाही.परंतु परिस्थिती नुसार प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या पध्दतीने निर्णय घ्यायचे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या विचारसरणीचे लोक सुद्धा होते.यात जहालवादी, मवाळवादी, क्रांतिकारक अशा अनेक विचारधारांचे लोक होते.त्यामुळे आपसात मतभेद अवश्य असायचे परंतु मतभिन्नता नव्हती.त्यामुळे सर्वांचा एकच उद्देश होता तो म्हणजे भारताला इंग्रजांच्या तावडीतून मुक्त करून स्वतंत्र करने त्यापध्दतीने सर्वांनी आपआपले योगदान दिले व भारत १९४७ ला स्वातंत्र्य झाला.यात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे मोठे योगदान होते. सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ मध्ये झाला व त्याचा मृत्यू २६फेब्रुवारी १९६६ ला झाला.आज त्यांचा मृत्यू होऊन ५८ वर्षे झालीत आणि भारत स्वतंत्र होऊन ७७ वर्षे झालीत मग आताच राजकीय पुर्ढायांना कसे काय आठवले की सावरकरांनी इंग्रजांना मदत केली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा इतिहास महाराष्ट्रातील जनतेला, राजकीय पुर्ढायांना, पक्ष-विपक्षांना चांगल्या प्रकारे ग्यात आहे. त्यामुळे बाहेरच्या राजकीय पुर्ढायांनी महाराष्ट्रातील जनतेला स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल जास्त ग्यान देवु नये. कारण स्व.इंदिरा गांधीसह अनेकांनी सावरकरांचा उल्लेख स्वातंत्र्यवीर सावरकर असा अनेकदा केला आहे ही बाब सावरकरांचा विरोध करर्णाया राजकीय पुर्ढायांनी लक्षात ठेवली पाहिजे. थोरमहात्मे, क्रांतिकारक, स्वातंतासेनानी किंवा आपले पुर्वज ज्यांच्या कर्तृत्ववामुळे आपण खुला स्वास घेत आहे अशांबद्दल अपशब्द किंवा आक्षेपार्ह विधान निघणार नाही याची काळजी सर्वच राजकीय पुर्ढायांनी घ्यावी. सरकारला मी आग्रह करेल की स्वातंत्रवीर सावरकर यांच्या बद्दल किंवा आपल्या पुर्वजांबद्दल यानंतर कोणीही आक्षेपार्ह विधान केले तर त्यावर कठोर कारवाई करावी.सध्या देशात विद्वेषी वक्तव्य देण्याचे प्रकार वाढले आहेत.यामुळे सुप्रीम कोर्टाने दिनांक २८ एप्रिल २०२३ रोज शुक्रवारला सुप्रीम कोर्टाने आदेश काढला की विद्वेषी वक्तव्ये करणारे यांची कोणी तक्रार करेल याची वाट न पाहता राज्यांनी कारवाई करावी.त्या कृतीस विलंब झाला तर तो कोर्टाचा अवमान समजला जाईल असे सुप्रीम कोर्टाने आपल्या आदेशात बजावले आहे.त्यामुळे विद्वेषी वक्तव्ये करर्णायांनी आपल्या जिभेवर आवर घालावा. जोपर्यंत सुर्य -चंद्र-तारे-आकाश-पाताळ आहे तोपर्यंत सावरकरांचे व संपूर्ण देशभक्तांचे नाव देशात स्वाभिमानाने घेतले जाईल. स्वातंत्रवीर सावरकरांना जयंती निमित्त माझा कोटी कोटी प्रणाम!जय हिंद.

# भारतीय स्वातंत्र्यवीरांचे कुलपुरुष वि.दा.सावरकर

**वि.दा. सावरकरांचा** जन्म २८मे,१८८३ साली झाला. ज्या स्वातंत्र्य वीरांनी भारतम ातेच्या गळ्यात स्वातंत्र्य ची दैदिप्यमान रत्नमाला घातली ते आद्य रत्न हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज तर अखेरचे रत्न वीर सावरकर होते.वीर सावरकरांना देशात इंग्रजांची गुलामगिरी मान्य नव्हती.स्वातंत्र्य ही राष्ट्राची नाडी असते आणि या स्वातंत्र्यसाठी प्राण गेला तरी चालेल,पण भारत मातेच्या मुक्ततेसाठी लढा द्यायलाच हवा,हा विचार सावरकरांच्या मनात खोलवर रुजला होता,या साठी त्यांनी संपूर्ण विश्वातील क्रांतीचा अभ्यास करून क्रांतिवीरांचे विविध मार्ग जाणून घेतले.आपल्या अष्टभुजा देवी पुढे त्यांनी शपथ घेतली की,देशाला स्वातंत्र्य मिळिवण्यासाठी व भारत मातेला इंग्रजांच्या जाचातून मुक्त करण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मी मारता!मारता!!मरे तोवर झुंजेन! वयाच्या १४व्या वर्षीच मृत्यूला आव्हान देण्याची प्रतिज्ञा सावरकरांनी केली, आणि ती खरी करून दाखविली.त्यानी या साठी तरुणांच्या मनामध्ये स्वातंत्र्यची ज्योत प्रज्वलित केली. त्यांना भारत मातेच्या मुक्ततेसाठी लढा देण्यास सज्ज केले.वयाच्या २५व्या वर्षी सावरकर सशस्त्र क्रांतीचे सूत्रधार बनले,आपली मातृभूमी मुक्त व्हावी म्हणून जणू त्यांनी जन्मापासून प्राण यज्ञच आरंभलेला होता. सावरकरांनी देशासाठी अनन्वित यातना सहन केल्या,प्राणांतिक अग्नी दिव्यातून ते गेले,काळ्या पाण्याची शिक्षा झाल्यावर ते यत्किंचितही डगमगले नाही. काळ्या पाण्याच्या कारागृहात त्यांच्यावर अनंत अन्याय,अत्याचार झाले, मात्र त्या विरुद्ध त्यांनी क्रोधाचा एक शब्दही काढला नाही.सावरकरांचे रक्तबिंदू ज्या भूमीवर सांडले ते अंदमांनचे काळे पाणी सुद्धा सावरकरांच्या सहवासामुळे पवित्र तिर्थसारखे वाटू लागले.वीर सावरकर म्हणजे भारतीय स्वातंत्र्यच्या इतिहासातील एक तेजस्वी पर्वच होय.वीर सावरकर यांचे साहित्य म्हणजे देशभक्तीचे धगधगते अग्निकुंड होय.सारा देश अन्याय विरुद्ध पेटविण्याची क्षमता त्यांच्या लेखणी मध्ये आहे.वीर सावरकरांचे साहित्य आजही आमच्यात राष्ट्र निष्ठे विषयी जागरूकता निर्माण करीत आहे. भारतीय स्वातंत्र्य संग्रामला आंतरराष्ट्रीय स्वरूप देणारे वीर सावरकर हे पहिले क्रांतिकारक होय.म्हणून त्यांना भारतीय क्रांतिकारकांचे मुकुट मणी संबोधल्या जाते. वीर सावरकर यांच्या दैदिप्यमान वीर स्मृतींना कोटी, कोटी प्रणाम.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# औरंगाबाद-जालना स्थानिक प्राधिकारी निवडणूक; जिल्ह्यात मनाई आदेश जारी

छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) - औरंगाबाद-जालना स्थानिक प्राधिकारी निवडणूक सुरळीत, निष्पक्ष, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १८ मे २०२६ ते २५ जून २०२६ रोजी मतदान प्रक्रिया संपेपर्यंत मनाई आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार, निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेले अधिकारी-कर्मचारी आणि मतदानासाठी रांगेत उभे असलेले मतदार वगळता, जिल्ह्यात पाच किंवा पाच पेक्षा अधिक लोकांना एकत्र येण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात 'हे' नियम पाळावे लागणार असून

निवडणुकीची गोपनीयता आणि सुरक्षितता राखण्यासाठी मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीला, तसेच मतदान केंद्रातील मतदान प्रतिनिधींना मोबाईल फोन, कॉर्डलेस फोन, मेगा फोन, मायक्रोफोन किंवा वायरलेस सेट वापरण्यास आणि फोटो काढण्यास सक्त मनाई असेल. बंदोबस्तासाठी नेमलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी वगळून इतर कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही प्रकारची शस्त्रे बाळगता येणार नाहीत. तसेच, केवळ परवानगी दिलेल्या वाहनांनाच या परिसरात प्रवेश मिळेल. मतदान केंद्र परिसरात निवडणूक विषयक प्रचार करणे, मतदारांना धमकावणे किंवा ठराविक उमेदवारालाच मतदान करण्यासाठी दबाव टाकण्यास पूर्ण मनाई आहे. ज्वलनशील पदार्थ, स्फोटक साहित्य किंवा मनुष्य आणि मतदान यंत्राला (EVM) हानी पोहोचवू शकेल अशी कोणतीही वस्तू नेण्यावर बंदी घालण्यात आली आहे. या आदेशाचे भंग केल्यास ती व्यक्ती भारतीय न्याय संहिता कलम २२३ नुसार शिक्षेस पात्र राहील असे आदेशात नमूद केले आहे. तसेच भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कलम १६३ अन्वये कडक कायदेशीर कारवाई केली जाईल आणि ती व्यक्ती शिक्षेस पात्र राहील असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# बकरी ईद : त्याग, करुणा आणि माणुसकीचा खरा अर्थ

**भारतीय** समाजजीवनातील सण-उत्सव ही केवळ आनंदाची क्षणे नसतात तर ते समाजाच्या नैतिक मूल्यांची, सांस्कृतिक परंपरांची आणि मानवी नात्यांची पुनःप्रत्ययकारी स्मृती असतात. प्रत्येक सण माणसाला काहीतरी शिकवून जातो. काही सण आनंद शिकवतात, काही कृतज्ञता, काही एकात्मता, तर काही आत्म परीक्षण. बकरी ईद, ज्याला ईद-उल-अजहा असेही म्हटले जाते, हा असाच एक सण आहे, जो केवळ धार्मिक विधींचा दिवस नसून त्याग, समर्पण, करुणा आणि सामाजिक जबाबदारी यांचे गहिरे तत्त्वज्ञान आपल्या समोर ठेवतो. आजच्या काळात सणांचे स्वरूप अनेकदा बाह्य दिखाऊपणाकडे झुकताना दिसते. उत्सवांचा अर्थ अनेकदा कपडे, सजावट, भोजन आणि औपचारिक शुभेच्छांपुरता मर्यादित होतो. अशा वेळी बकरी ईद आपल्याला आठवण करून देते की खरा सण बाह्य प्रदर्शनात नसतो; तो अंतर्मनातील मूल्यांच्या जागृतीत असतो.

बकरी ईदची प्रेरणा इस्लामी परंपरेतील एका अत्यंत अर्थपूर्ण प्रसंगातून मिळते. परमेश्वराच्या आदेशापुढे संपूर्ण समर्पण दाखवत इब्राहिम यांनी आपल्या सर्वांत प्रिय गोष्टीचाही त्याग करण्याची तयारी दाखवली. ही कथा केवळ धार्मिक आख्यायिका म्हणून पाहण्याची नाही. तिच्या गाभ्यात एक अत्यंत मानवी आणि सार्वकालिक प्रश्न आहे, माणूस स्वतःच्या स्वार्थापेक्षा मोठ्या मूल्यांसाठी किती तयार आहे? आज समाजासमोर याच प्रश्नाचे वेगळ्या रूपात पुनरागमन होत आहे. आपण विकासाच्या, आधुनिकतेच्या आणि प्रगतीच्या भाषा बोलतो, पण त्यागाची भाषा किती बोलतो? आपण अधिकारांची मागणी करतो, पण जबाबदारीचे भान किती ठेवतो? आपण सुखाच्या मागे धावतो; पण दुसऱ्याच्या दुःखात किती थांबतो?

बकरी ईदचा खरा संदेश याच ठिकाणी अधिक तेजस्वी होतो. या सणाचा केंद्रबिंदू म्हणजे 'कुर्बानी'. पण कुर्बानीचा अर्थ केवळ एका धार्मिक विधीपुरता मर्यादित ठेवणे हा त्याचा संकुचित अर्थ ठरेल. कुर्बानी म्हणजे आपल्या अहंकाराचा त्याग, लोभाचा त्याग, अन्यायकारक वृत्तीचा त्याग, स्वार्थाचा त्याग. दुसऱ्याच्या हितासाठी स्वतःच्या काही गोष्टी बाजूला ठेवण्याची तयारी म्हणजे कुर्बानी. आज समाजात तणाव वाढत आहेत. धर्म, जात, भाषा, प्रदेश, विचारधारा प्रत्येक ठिकाणी भिंती उभ्या राहताना दिसतात. संवाद कमी होतो आहे, संशय वाढतो आहे, सहजीवनाचे मूल्य कमकुवत होत आहे. अशा वेळी बकरी ईदचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. कारण हा सण सांगतो की श्रद्धा ही केवळ वैयक्तिक भक्ती नसते तर ती सामाजिक करुणेशी जोडलेली असली पाहिजे.

या सणातील आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे वाटणीची भावना. कुर्बानीतून मिळालेल्या अन्नाचा काही भाग गरीब, गरजू आणि वंचितांपर्यंत पोहोचवण्याची परंपरा ही केवळ धार्मिक आचारसंहिता नाही; ती सामाजिक न्यायाची जिवंत जाणीव आहे. आज जगभर संपत्ती वाढत आहे, पण विषमताही वाढत आहे. शहरांच्या आकाशाला भिडणाऱ्या इमारतींच्या सावलीत उपाशी पोटांची संख्या कमी झालेली नाही. विकासाच्या भाषणांबरोबरच बेरोजगारी, महागाई, असुरक्षितता आणि उपेक्षा यांचीही कठोर वास्तवता आहे. अशा वेळी बकरी ईद आपल्याला सांगते की उत्सव तेव्हाच पूर्ण होतो, जेव्हा आनंदाच्या ताटात दुसऱ्याचाही हक्क असतो. ही भावना अत्यंत महत्त्वाची आहे. कारण समाज केवळ कायद्यांनी टिकत नाही, तो संवेदनांनी टिकतो. संविधान समानतेचा मार्ग दाखवते, पण करुणा त्या मार्गावर चालण्याची नैतिक ताकद देते.

आजच्या सार्वजनिक जीवनात संवेदनशीलतेचा अभाव तीव्रतेने जाणवतो. राजकारणात कटुता वाढते आहे, सार्वजनिक चर्चेत सभ्यता कमी होते आहे, सामाजिक माध्यमांवर अपमानाची भाषा सामान्य झाली आहे. दुसऱ्याच्या वेदनेकडे पाहण्याची क्षमता कमी होत चालली आहे. अशा वातावरणात बकरी ईदचा संदेश केवळ एका समुदायापुरता मर्यादित राहत नाही, तो संपूर्ण समाजासाठी नैतिक धडा ठरतो. हा सण आपल्याला सांगतो धर्माचा खरा अर्थ विभाजनात नाही, तर माणुसकीत आहे. भारतीय समाजाची खरी ताकद त्याच्या विविधतेत आहे. इथे बकरी ईद, दिवाळी, ख्रिसमस, बुद्ध पौर्णिमा हे सर्व सण केवळ कॅलेंडरवरचे दिवस नसतात; ते परस्पर सन्मान आणि सहअस्तित्वाच्या संस्कृतीचे प्रतीक असतात. या भूमीची ताकद एकरूपतेत नाही; ती अनेकतेतून उभ्या राहिलेल्या ऐक्यात आहे. म्हणूनच बकरी ईदच्या निमित्ताने एक गोष्ट विशेषत्वाने लक्षात ठेवावी लागेल, धर्माचे बाह्य रूप समजणे सोपे असते; पण त्यातील मानवी गाभा समजून घेणे अधिक आवश्यक असते.

बकरी ईदचा मानवी गाभा स्पष्ट आहे: त्याग करा, वाटा, दुसऱ्याच्या दुःखात सहभागी व्हा आणि परमेश्वरापुढे नम्र राहा. आजच्या पिढीसमोर उपभोगवादाचे प्रचंड आकर्षण आहे. यशाची व्याख्या अनेकदा पैसा, प्रतिष्ठा आणि भौतिक साधनांमध्ये अडकलेली दिसते. स्पर्धा आहे, धावपळ आहे, तुलना आहे, असुरक्षितता आहे. अशा वेळी बकरी ईद एक वेगळाच प्रश्न विचारते, तुमच्याकडे किती आहे हे महत्त्वाचे नाही, तुम्ही किती वाटू शकता हे अधिक महत्त्वाचे आहे. हीच खरी नैतिक उंची आहे. या सणाच्या निमित्ताने कुटुंब, नातेवाईक, शेजारी, मित्र यांच्यात भेटीगाठी होतात. एकमेकांना शुभेच्छा दिल्या जातात.

पण या भेटीगाठींच्या मागे एक मोठा सामाजिक अर्थ दडलेला आहे, नात्यांचे पुनरुज्जीवन. आजच्या काळात माणूस डिजिटलरीत्या जोडलेला आहे, पण भावनिकदृष्ट्या अनेकदा तुटलेला आहे. घरात माणसे आहेत, पण संवाद कमी आहे. समाजात गर्दी आहे, पण जवळीक कमी आहे. अशा वेळी सण हे नात्यांना पुन्हा उब देणारे प्रसंग ठरतात.

बकरी ईद आपल्याला हेही शिकवते की श्रद्धा आणि विवेक एकमेकांचे विरोधक नाहीत. खरी श्रद्धा माणसाला अधिक विनम्र, अधिक न्यायप्रिय आणि अधिक करुणामय बनवते. जर धर्म माणसाला दुसऱ्याचा द्वेष शिकवत असेल, तर तो धर्माचा आत्मा नसून त्याचे विकृत रूप आहे. आज जगाला सर्वांत जास्त गरज कोणत्या गोष्टीची आहे, तर ती आहे परस्पर विश्वासाची. धर्माच्या नावावर निर्माण होणारे तणाव, समाजमाध्यमांवर पसरवला जाणारा द्वेष, अफवांमधून पेटणारी अस्वस्थता, या सगळ्यांच्या काळात बकरी ईदचा संदेश अधिकच अर्थपूर्ण ठरतो. कारण हा सण आठवण करून देतो की खरी धार्मिकता माणसाला इतरांपासून दूर नेत नाही; ती त्याला अधिक जवळ आणते. या निमित्ताने समाजाने स्वतःलाही काही प्रश्न विचारायला हवेत.

आपल्या आनंदात दुसऱ्याचा वाटा आहे का? आपल्या श्रद्धेत करुणा आहे का? आपल्या समृद्धीत सामाजिक जबाबदारी आहे का? आणि सर्वांत महत्त्वाचे आपल्या धर्मात माणूस आहे का? हे प्रश्न केवळ तत्त्वज्ञानाचे नाहीत; ते लोकशाही समाजाच्या नैतिक आरोग्याशी संबंधित आहेत. बकरी ईदचा उत्सव मिरवणुकीत, सजावटीत किंवा औपचारिक शुभेच्छांत संपता कामा नये. तो आपल्या वर्तनात उतरला पाहिजे. जर या दिवशी आपण एखाद्या गरजवंताची मदत केली, एखाद्या उपाशी पोटी अन्न पोहोचवले, एखाद्या दुखावलेल्या नात्याला पुन्हा जुळवले, एखाद्या पूर्वग्रहाला मनातून काढून टाकले तरच या सणाचा आत्मा खऱ्या अर्थाने जिवंत राहील.

शेवटी, बकरी ईदचा संदेश अत्यंत साधा आहे, पण अत्यंत गहिरा आहे. मानवतेपेक्षा मोठा धर्म नाही. करुणेपेक्षा मोठी प्रार्थना नाही आणि वाटणीपेक्षा मोठा उत्सव नाही. बकरी ईदच्या या पवित्र निमित्ताने आपण असा संकल्प करूया की श्रद्धा असू द्या, पण त्यात नम्रता असू द्या, समृद्धी असू द्या, पण त्यात वाटणी असू द्या, मतभेद असू द्या, पण वैर नको. कारण शेवटी समाज महान होतो तो त्याच्या संपत्तीने नाही, तर त्याच्या संवेदनांनी. बकरी ईदच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा. त्यागाची जाणीव, करुणेची ऊब आणि माणुसकीचा प्रकाश आपल्या समाजात अधिक दृढ होत राहो, हीच मंगलकामना.

**- प्रविण बागडे**

# २८ मे स्वातंत्र्यवीर सावरकर १४३ वी जयंती छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या स्वरूपात साजरी होणार

छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) - स्वातंत्र्यवीर सावरकर १४३ वी जयंती महोत्सव समिती छत्रपती संभाजीनगरतर्फे शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. क्रांतिकारकांचे मुकुटमणी, साहित्यिक, महाकवी, स्वातंत्र्यवीर, मानवतावादी, प्रखर विचारवंत, युगपुरुष, राष्ट्रीय अस्मितेचे उद्गाते, स्वदेशीची पुरस्कर्ते, परिवर्तनाचे प्रवर्तक, आधुनिक भारताचे शिल्पकार, थोर समाजसेवक, तत्त्वचिंतक, दूरदर्शी तत्त्वज्ञकार, बॅरिस्टर, मातृभक्त, विश्वसमालोचक, सेना समालोचक, विज्ञाननिष्ठ असे शतपैलू असणारे सावरकर.

१) सकाळी ठीक ८ वा. समर्थ नगर येथील स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुतळ्यास अभिवादनाने सुरुवात सकाळी ८ ते ११.३० पर्यंत विविध संस्था, संघटना, राजकीय पक्ष सामाजिक संघटना ह्या अभिवादन करण्यास येणार आहे.

२) भव्य रक्तदान शिबिर आयोजक स्वर्गीय दत्ताजी भाले रक्त केंद्र सकाळी ९ वा. ठिकाण - स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळा, समर्थ नगर.

३) परशुराम चौक, संभाजी पेठ, सावरकर चौक, सिडको, त्रिमूर्ती चौक, जव्हार कॉलनी,पदमपुरा, छावणी, अविष्कार कॉलनी, चिकलठाणा, बेगमपुरा, पहाडसिंगपुरा, ज्योती नगर, सातारा परिसर, छत्रपती नगर, देवळाली चौक, रामनगर, जय भवानीनगर, अशा शहराच्या विविध चौकांमध्ये सावरकर जयंती साजरी केल्या जाणार आहे.

४) योगासन स्पर्धा- सायंकाळी ६ ते ७

वादळ तेजाचे - सावरकरांच्या साहित्याचे अभिवाचन सायंकाळी ७ ते ८

५) देशभक्ती आणि सावरकर गीतांचा स्वराज - वंदेमातरम कार्यक्रम- प्रख्यात गायक संगीतकार प्रमुख सरकटे

सायंकाळी ८ ते ९.३०, स्थळ - गोविंदभाई श्राफ सभागृह, सरस्वती भुवन प्रांगण, संभाजी पेठ बस स्थानक जवळ, छत्रपती संभाजीनगर

६) दीपोत्सव- १४३ दिवे लावून सावरकरांना वेगळी आदरांजली. रात्री ८.३० वाजता. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा पुतळा, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर.

वरील सर्व कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, ही स्वातंत्र्यवीर सावरकर १४३वी जयंती महोत्सव, छत्रपती संभाजीनगरतर्फे विनंती करण्यात येत आहे. जयंती महोत्सवाचे अध्यक्ष जालिंदर शेंडगे, निमंत्रक भाऊ सुरडकर, प्रदीप बुरांडे, किशोर मानकापे, आनंद तांदूळवाडीकर, प्रमोद सरकटे, सुधीर नाईक, गोविंद कुलकर्णी, सुभाष कुमावत, किरण सराफ, विजय जहागीरदार, सुहास ठोसर, राजेश मेहता, अभिषेक कादी, संजय मांडे, सचिन गुळवे, गोपाल कुलकर्णी, दिगंबर मोरे, जगदीश हर्सुलकर, योगेश वाणी, गजानन पिंपळे, विजया कुलकर्णी, क्रांती देशमुख, साधना सुरडकर, गीता आचार्य, संध्या कापसे, विजया अवस्थी, सुनीता देव, स्मिता जोशी, संयोजन समितीने केले आहे.

# श्रमशक्ती व असंघटीत क्षेत्रातील उद्योगांचे सर्वेक्षण; आवश्यक माहिती देण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) - नियोजन विभागांतर्गत अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने राष्ट्रीय नमुना पाहणीअंतर्गत नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण व असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण राबविण्यात येणार आहे.यानिमित्त सर्वेक्षणासाठी येणाऱ्या अन्वेषक, पर्यवेक्षकांना आवश्यक माहिती द्यावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मित्रा), नाशिक येथे या संदर्भात अन्वेषक आणि पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण सुरु आहे. दि.३१ मे पर्यंत हे प्रशिक्षण सुरु राहणार आहे. या कार्यशाळेला विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम अध्यक्षस्थानी होते. विशेष आयुक्त कृष्णा फिरके, अतिरिक्त आयुक्त दिनेश वाघ, सहआयुक्त सरिता यादव, शिरीष व्हरसाळे, हेमंत अहिरे, संचालक तृप्ती शर्मा उपस्थित होते. या सर्वेक्षणांसाठी नियुक्त अन्वेषक व पर्यवेक्षकांना खझडजड या बाह्य संस्थेमार्फत पाच दिवसीय प्रशिक्षण देण्यात येत आहे. या प्रशिक्षणामध्ये रोजगार-बेरोजगारीची स्थिती, कामगार सहभाग दर, उद्योगनिहाय रोजगार रचना तसेच असंघटित क्षेत्रातील उद्योग-व्यवसायांची आर्थिक स्थिती, रोजगार, भांडवल, उत्पन्न व खर्च यांसंबंधी माहिती संकलनाच्या पद्धतींबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच सर्वेक्षणातील संकल्पना, व्याख्या, कार्यपद्धती, क्षेत्रीय अंमलबजावणी आणि गुणवत्ता नियंत्रण याविषयी सविस्तर प्रशिक्षण दिले जाणार आहे. या सर्वेक्षणांतून प्राप्त होणारे निष्कर्ष राज्यातील रोजगारविषयक धोरणे ठरविणे, असंघटित क्षेत्राच्या विकासासाठी योजना आखणे तसेच आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील विविध निर्णय प्रक्रियेसाठी उपयुक्त ठरणार असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

सन २०४७ पर्यंत विकसित भारताच्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रत्येक राज्य व जिल्ह्याच्या विकासासाठी अचूक आकडेवारी महत्त्वाची असून, नागरिकांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या अन्वेषक व पर्यवेक्षकांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी केले.

# लाऊडस्पीकरच्या वापरावर निर्बंध

छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) - औरंगाबाद- जालना जिल्हा स्थानिक प्राधिकारी निवडणूक आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर निवडणुकीच्या प्रचारादरम्यान होणारे ध्वनीप्रदूषण आणि सर्वसामान्यांची शांतता अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी विनय गौडा जी.सी यांनी ध्वनीक्षेपकांच्या (लाऊडस्पीकर) वापरावर आदेशा द्वारे कडक निर्बंध लादले आहेत.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३३ (ड) आणि (ढ) अन्वये हे आदेश जारी करण्यात आले असून, दिनांक २५ मे २०२६ पासून ते २५ जून २०२६ पर्यंत (निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत) हे नियम संपूर्ण जिल्ह्यासाठी लागू राहतील.

कोणत्याही राजकीय पक्षाला, उमेदवाराला किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांना संबंधित पोलीस अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगी शिवाय ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. सकाळी ६.०० वाजण्यापूर्वी आणि रात्री १०.०० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर किंवा कोणत्याही क्षेत्रात लाऊडस्पीकर लावण्यास पूर्णपणे बंदी असेल. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवारांना केवळ निश्चित केलेल्या ठिकाणीच ध्वनीक्षेपकाचा वापर करता येईल. तसेच या परवानगीची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेला देणे बंधनकारक राहील.

जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी स्पष्ट केले आहे की, प्रत्येक व्यक्तीवर वैयक्तिकरित्या हे आदेश तामील करणे शक्य नसल्याने, पोलिस विभागणी ध्वनीक्षेपकाद्वारे (दवंडी पिटवून) जाहीर करून या आदेशाची जनजागृती करावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# वैजापूरचे नाडीयोगतज्ज्ञ डॉ.अशोक सरोदे यांच्या कार्याची ५ वर्ल्ड रिकाड्‌र्स मध्ये नोंद

## ३८ वर्षांची विनामुल्य योगसेवा व स्वत:चा 'कायाकल्प'या निष्कर्षावर घडले ५ रिकाड्‌र्स



वैजापूर, दि. २७ (प्रतिनिधी) - साहित्यरत्न लोकशहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक कला रंगमंदिर, पुणे येथे दि.१४/०५/२०२६ रोजी रंगमंदिरच्या एअरकंडिनर थियेटर मध्ये एका भव्य समारंभात जगप्रसिद्ध ' लंडन बुक आफ वर्ल्ड रिकाड्‌र्स' चे सिईओ डॉ.अविनाश सुकूंडे यांच्या हस्ते प्रख्यात नाडीयोगतज्ज्ञ डॉ. अशोक सरोदे यांना १) लंडन बुक आफ वर्ल्ड रिकाड्‌र्स २) यु एस ए बुक आफ वर्ल्ड रिकाड्‌र्स ३) आशियन बुक आफ वर्ल्ड रिकाड्‌र्स ४) भारत बुक आफ वर्ल्ड रिकाड्‌र्स आणि ५) यु एन बुक आफ वर्ल्ड रिकाड्‌र्स अशा ५ वर्ल्ड रिकाड्‌र्स मध्ये नांव नोंदविलेली प्रमाणपत्रे व ट्राफी देवून सन्मानित करण्यात आले.

गेल्या ३८ वर्षांपासून प्रत्येकाचे नाडीपरिक्षण करून व वात, पित्त, कफ वा संमिश्र प्रकृतीचे निदान करून व भिन्न भिन्न चार गटात प्रात्यक्षिकासह

योगाभ्यास शिकवून आजवर ५०,००० पेक्षा अधिक शहरी,ग्रामिण जनतेसाठी केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या विभिन्न राज्यात देखील शेकडो विनामुल्य योगशिबीरे राबवून त्यांना आरोग्य संपन्न बनविले व लाखो लोकांना योगा करण्यासाठी प्रोत्साहित केले. तसेच या व्यतिरीक्त आज ७१ व्या वर्षांच्या वयात देखील स्वत: ची शरीरयष्टी नित्य नियमाने योगा करून ४५ वर्षांच्या व्यक्ती सारखी राखून 'कायाकल्प' घडविला. ही बाब चमत्कारापेक्षा कमी नाही म्हणून त्यांच्या नावे सदर ५ वर्ल्ड रिकाड्‌र्स नोंदविले गेले.

एकाच वेळी पाच वर्ल्ड रिकाड्‌र्स पटकविण्याची ही देशातील पहिली वेळ असावी, नुकतीच त्यांची 'लंडन हेराल्ड' या जगप्रसिद्ध मासिक पत्रिकेत सचित्र पाच पानांची मुलाखत प्रकाशित करण्यात आली होती.

या अद्वितीय कामगिरी बाबत त्यांना देशातून व राज्यातून अनेक मान्यवरांचे अभिनंदनपर फोन येत आहेत. तसेच वैजापूरचे ना. प्रतोद प्रा. रमेश पा. बोरनारे सर, नगराध्यक्ष डॉ. दिनेशभाऊ परदेशी, नमामी गंगे प्रतिष्ठान चे प्रविण पा. सावंत व सहकारी, धोंडीरामसिंह राजपूत, रामचंद्र पिल्दे, कुबेर प्रतिष्ठान चे गौरव दोडे व त्यांचे सहकारी, गोरखनाना बोडखे, बी.बी. थोरात, शिवनाथ इंगळे, अशोक मांजरे, वरिष्ठ नागरिक संघाचे अशोक धसे सर व सहकारी, साईबाबा पारायण सोहळ्याचे रविन्द्र आप्पा साखरे व सहकारी, सुशिलकुमार आसर, राहुल व आशिष सरोदे, राजेंद्र मेढे, शुभदाताई चव्हाण, ठोकळ, धुळे, सुनील साळुंके आदिंनी अभिनंदन केले आहे.

# विपुल अमृतलाल शाह यांच्या 'गव्हर्नर' चा ट्रेलर रिलीज




विपुल अमृतलाल शाह यांच्या 'सनशाइन पिक्चर्स' बॅनरखाली येणारा चित्रपट 'गव्हर्नर' इतिहासातील त्या अनकथित आणि दडपून ठेवलेल्या पानांना उलगडणार आहे, ज्यांची कधीच चर्चा झाली नव्हती. मनोज बाजपेयी यांच्या दमदार अभिनयाने सजलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन मराठी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध आणि दिग्गज दिग्दर्शक चिन्मय मांडलेकर यांनी केले आहे. बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालणाऱ्या 'द केरळ स्टोरी' आणि 'द केरळ स्टोरी २' सारख्या चित्रपटांचे निर्माते आता प्रेक्षकांसाठी आणखी एक प्रभावी आणि हादरवून टाकणारा सिनेमॅटिक अनुभव घेऊन येत आहेत!

मनोज बाजपेयी यांच्या वाढदिवसानिमित्त जेव्हा विपुल अमृतलाल शाह यांच्या आगामी चित्रपट 'गव्हर्नर'चा फर्स्ट लूक पोस्टर समोर आला, तेव्हापासूनच या मॉडर्न हिस्ट्री ड्रामाबद्दल मोठी चर्चा सुरू झाली होती. सस्पेन्सने भरलेल्या टीझरनंतर आता निर्मात्यांनी चित्रपटाचा एक अतिशय दमदार आणि थरारक ट्रेलर रिलीज केला आहे, जो अंगावर शहारे आणतो आणि विचार करायला भाग पाडतो.

चित्रपटाचा ट्रेलर भारताच्या आर्थिक इतिहासातील त्या सर्वात मोठ्या आणि काळ्याकुट्ट अध्यायावर प्रकाश टाकतो, जेव्हा १९९० साली आपला देश कंगाली आणि दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर पोहोचला होता. ढासळणाऱ्या अर्थव्यवस्थेमुळे देशभर निर्माण झालेला गोंधळ आणि रस्त्यावर उतरलेला जनतेचा संताप ट्रेलरमध्ये प्रभावीपणे दाखवण्यात आला आहे. या महासंकटाच्या काळात भारताला बुडण्यापासून वाचवण्यासाठी एक ऐतिहासिक निर्णय घ्यावा लागला, ज्याने सगळंच बदलून टाकलं. ट्रेलर देशाच्या त्या सर्वात कठीण आणि आव्हानात्मक काळाची वास्तव कहाणी मांडतो. मनोज बाजपेयी आणि अदा शर्मा यांच्या उत्कृष्ट अभिनयामुळे हा चित्रपट खूपच आशादायक वाटतो.

ट्रेलर रिलीज झाल्यानंतर देशाच्या या सर्वात मोठ्या आणि अनसुना आर्थिक संकटाची कथा मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढली आहे. दमदार अभिनय आणि थेट मनाला भिडणारी कथा यांच्या जोरावर हा चित्रपट प्रत्येक भारतीयासाठी एक महत्त्वाचा चित्रपट ठरणार आहे.

इतकंच नाही, तर निर्मात्यांनी आजच्या पिढीतील त्या तरुणांसाठी एक खास आणि वेगळी स्क्रीनिंग आयोजित केली होती, ज्यांना १९९० मधील या मोठ्या आर्थिक घडामोडीबद्दल फारशी माहिती नव्हती. येथे या तरुणांना चित्रपटाचा शानदार ट्रेलर पाहायला मिळाला आणि त्याचबरोबर निर्माते व कलाकारांशी संवाद साधण्याची आणि चर्चा करण्याची संधीही मिळाली.

'गव्हर्नर' हा सत्य घटनांवर आधारित चित्रपट आहे, जो १९९० च्या दशकात भारतावर आलेल्या सर्वात भीषण आर्थिक संकटाचं काळं सत्य समोर आणतो. चित्रपटाचा ट्रेलर एका अशा दमदार कथानकाची झलक देतो, जी प्रेक्षकांना हादरवून सोडेल. यात राष्ट्रीय पुरस्कार विजेते अभिनेते मनोज बाजपेयी एका 'गव्हर्नर'च्या कडक आणि वेगळ्या भूमिकेत दिसणार आहेत, ज्यामध्ये प्रेक्षकांनी त्यांना यापूर्वी कधीच पाहिलं नाही.

प्रभावी संवादांनी सजलेला हा चित्रपट 'सनशाइन पिक्चर्स'च्या बॅनरखाली सादर केला जात आहे. चिन्मय मांडलेकर यांच्या दिग्दर्शनाखाली आणि विपुल अमृतलाल शाह यांच्या निर्मितीत तयार झालेल्या या चित्रपटाचे सह-निर्माते आशिन ए. शाह आहेत. तर याची दमदार पटकथा सुवेंदु भट्टाचार्य, सौरभ भारत, रवि असरानी आणि विपुल अमृतलाल शाह यांनी एकत्रितपणे लिहिली आहे. या चित्रपटातील गीतं दिग्गज जावेद अख्तर यांनी लिहिली असून अमित त्रिवेदी यांनी त्यांना उत्कृष्ट संगीत दिलं आहे. हा चित्रपट याच वर्षी १२ जून २०२६ रोजी मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होणार आहे.


सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

: संपादक :

**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**

मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५

e-mail:lokvijay2000@yahoo.co.in



या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.

(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# कृषी निविष्ठा संनियंत्रण समिती बैठक : शेतकऱ्यांना बियाणे, खते वेळेत उपलब्ध करा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- खरीप हंगामाच्या दृष्टीने आवश्यक कृषी निविष्ठा जिल्ह्यात उपलब्ध आहेत. पेरणीच्या वेळापत्रकाप्रमाणे त्या शेतकऱ्यांपर्यंत सुव्यवस्थित नियोजन करुन पोहोचवा, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज दिले.

कृषी निविष्ठा संनियंत्रण समितीची बैठक आज जिल्हा नियोजन सभागृहात पार पडली. विभागीय कृषी सहसंचालक सुनिल वानखेडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, जिल्हा कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, सर्व तालुका कृषी अधिकारी, कृषी निविष्ठा उत्पादक, विक्रेते, वितरक, वाहतुकदार आदी बैठकीस उपस्थित होते.

सहसंचालक वानखेडे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना खतांची मागणी मोबाईलवरुन नोंदवून घरपोच खते देण्याबाबत पथदर्शी प्रकल्प राबविला जाणार आहे. त्यासाठी कृषी सेवा केंद्रांनी आपले आयडी तयार करावे. आयएफएमएस असे या पोर्टल/ ॲपचे नाव असून याद्वारे शेतकरी मोबाईलद्वारे आपली मागणी नोंदवू शकतील, असे त्यांनी सांगितले. हा प्रथदर्शी प्रकल्प आपल्या जिल्ह्यात राबवावयाचा असून त्यासाठी निविष्ठा विक्रेत्यांनी आपले आयटी तयार करावे, असे त्यांनी सांगितले.

जिल्हा कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील यांनी सादरीकरण करुन नियोजन सादर केले. त्यांनी माहिती दिली की, जिल्ह्यात ३ लाख ४५ हजार ८०६७ हेक्टर क्षेत्रावर खरीपाच्या पेरणीचे नियोजन



असून त्यासाठी ३१ हजार ३२ क्विंटल बियाण्याची आवश्यकता आहे. सर्वाधिक नियोजीत क्षेत्र कपाशी लागवडीचे असून त्यासाठी ७७११ क्विंटल (१७ लाख १३ हजार पाकिटे) बियाणे आवश्यक आहे.

**पिकनिहाय प्रस्तावित पेरणीक्षेत्र**

कापूस-३०८४५४ हे., मका-२६५६३० हे., तूर-५४८०३ हे., सोयाबीन- ३४२१७ हे., मुग- १२१६७ हे., बाजरी- ९०६८ हे., भुईमुग- ८१९९ हे., उडीद-३८६६ हे, खरीप ज्वारी- ७३ हे., तीळ-१३९ हे, इतर पिके-४७१ हे. असे एकूण ६ लाख ९७ हजार १८७ हेक्टर क्षेत्रावर पिकनिहाय पेरणी प्रस्तावित आहे.

पिकनिहाय बियाणे मागणी याप्रमाणे- मका- ३९८४५ क्विंटल, तूर-२८७७ क्विंटल, मुग-४०२ क्विंटल, उडीद-२०३क्विंटल, कापूस ७७११ क्विंटल (१७ लाख १३ हजार पाकिटे), सोयाबीन बियाणे- २५ हजार ७३८ क्विंटल. इतकी मागणी आहे. सर्व पिके मिळून जिल्ह्यात ५१ हजार ७२५ क्विंटल बियाणे मागणी आहे. त्यापैकी महाबीज, एनएससी व खाजगी पुरवठादार यांच्याकडून पुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात रासायनिक खतांचा सरासरी वापर २ लाख ७३ हजार १९३ मे.टन इतका असून खरीप हंगाम २०२६ साठी ३ लाख ९५ हजार ७४९ मे.टन इतकी मागणी आहे. त्यात युरिया- १ लाख ५१ हजार २३० मे.टन, डीएपी- ४७ हजार ३६० मे.टन, एम.ओ.पी.- २६४१२ मे.टन., एनपीके-१ लाख ४१ हजार ९५५ मे.टन, एसएसपी- २८७९२ मे.टन असे एकूण ३ लाख ९५ हजार ७४९ मे.टन खतांची मागणी आहे. जिल्ह्यासाठी मंजूर आवंटन २ लाख ९२ हजार ७०० मे.टन इतके आहे. हे आवंटन आवश्यकतेनुसार पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यात एप्रिल २०२५ अखेर शिल्लक खत साठा १ लाख २३ हजार ९२८ मे.टन इतका आहे.

जिल्ह्यात कृषी निविष्ठा विक्रीसाठी तब्बल ८९९२ विक्रेते आहेत. त्यात बियाणे विकेते-४४७६, खत विक्रेते-२३८६, कीटक नाशक विक्रेते-२१३० असे आहेत. वितरण विक्री प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक तालुकानिहाय १ याप्रमाणे ९ व जिल्हास्तरीय १ असे १० भरारी पथके आहेत. गुणनियंत्रणासाठी जिल्हास्तरीय ४ निरीक्षक तर तालुकास्तरीय १८ असे २२ निरीक्षक आहेत.

जिल्हाधिकारी गौडा म्हणाले की, बियाणे विक्री करण्याआधी त्यांची उगवण क्षमता तपासणी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय बियाणे विक्री करु अनका. खतांच्या पुरवठ्याचे नियमन करतांना गरजेला प्राधान्य द्या नंतर संरक्षित साठ्याचे नियोजन करा. खताचे लिंकींग करु नका. अशाप्रकारे लिंकींग करुन शेतकऱ्यांची अडवणूक केल्यास जीवनावश्यक वस्तू अधिनियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल. एकंदर एल निनो आणि आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभुमिवर कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी पारदर्शकता जपून शेतकऱ्यांना वेळेत बियाणे, खते उपलब्ध करुन द्यावे. जिल्ह्यात डिजेल, पेट्रोलचा पुरवठा सुरळीत आहे. त्यामुळे कृषी निविष्ठांच्या वाहतुकीला कोणतीही अडचण येणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# जनगणना कार्याची दिल्लीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- केंद्र शासनाच्या जनगणना संचालनालयाचे अति. रजिस्ट्रार जनरल संजीव कुमार आणि त्यांच्या पथकाने जिल्ह्यात सुरु असलेल्या जनगणना कार्याची पाहणी केली. त्याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. आणि मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्याकडे आपली निरीक्षणे नोंदवून सुचना केल्या.

हे पथक दि.२५ पासून जिल्ह्यात दाखल झालेले असून त्यांनी जालना व छत्रपती संभाजीनगर या दोन्ही जिल्ह्यात पाहणी केली. त्यांच्या समवेत



सह संचालक संदीप राय, जिल्हा समन्वयक पवन गोडे, अलोक विश्वकर्मा, सत्यांशू सिंग आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी गौडा यांची व मनपा आयुक्त अमोल येडगे यांची त्यांनी भेट घेऊन चर्चा केली. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, मनपा उपायुक्त अपर्णा थेटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर आदी उपस्थित होते.

संजीवकुमार यांनी निरीक्षणे नोंदविली की, जिल्ह्यात जनगणनेचे कार्य उत्कृष्ट सुरु आहे. प्रगणक अगदी दुर्गम भागातही पोहोचले व त्यांनी आपले गणनेची नोंद केलेली आहे. महापालिका हद्दीत गृहनिर्माण संस्थांमध्ये प्रगणकांना प्रवेशास, नोंदी घेण्यास सुलभता येत नसल्याचे आढळले. त्यासाठी गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना सुचना निर्गमित करावी , अशी सुचना त्यांनी केली. तसेच नागरिकांनी परिपूर्ण माहिती द्यावी, अशीही सुचना त्यांनी केली. जिल्ह्यात अनेक लोक विजेसाठी सौर उर्जेचा वापर करतांना दिसत आहेत. त्यांची नोंद घेण्यात यावी अशीही सुचना त्यांनी केली. जिल्ह्याचे गणना कार्य उत्कृष्ट सुरु आहे, असा अभिप्रायही त्यांनी नोंदविला.

## छत्रपती संभाजीनगर मनपाचे दत्ता सरोदे आणि सहकारी विनोद विभुते यांनी माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्पवर फडकावला तिरंगा




छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर येथील गिर्यारोहक श्री दत्ता रामदास सरोदे (वय ५० वर्षे )आणि श्री विनोद विभुते (वय ४४ वर्षे)दिनांक २५.५.२०२६ रोजी नेपाळ येथील माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्प ५३६४ मिटर उंची वर अभिमानाने भारतीय राष्ट्रध्वज तिरंगा फडकावला . उणे तापमान असतांनाही प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी ही यशस्वी कामगिरी बजावली. श्री दत्ता रामदास सरोदे हे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका मध्ये कार्यरत असून त्यांनी व त्यांचे सहकारी यांनी यापूर्वी सन २०२३ मध्ये दक्षिण अफ्रिका खंडातील सर्वोच्च माउंट किलीमांजारो तसेच सन २०२४ मध्ये युरोप खंडातील सर्वोच्च माउंट एल्ब्रस ह्या शिखरावर भारतीय तिरंगा फडकाविलेला आहे. यांचे हे तिसरे आंतरराष्ट्रीय स्तरावरील यश आहे. या यशाचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## आज 'आपला वारसा आपली संस्कृती' या विषयावर भव्य चित्रकला स्पर्धा; ३०० वर स्पर्धकांचा सहभाग

### महापौर समीर राजूरकर यांचे हस्ते बक्षीस वितरण

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- 'आपला वारसा आपली संस्कृती' विषयावर जीएच रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक यूनिवर्सिटी, छत्रपती संभाजीनगर महानगर पालिका, औरंगाबाद फोटोग्राफर असोसिएशन, आणि जिल्हा मराठी पत्रकार संघ, छत्रपती संभाजीनगर यांच्या विद्यमाने ङआज दिनांक २८ मे २०२६ सकाळी ८ ते ११ या वेळेत चित्रकला स्पर्धा घेण्यात येत आहे.

स्पर्धा तीन ग्रुप मध्ये आयोजित करण्यात आलेली आहे. ङएकूण ३०० वर स्पर्धकानि नोंदणी केली असून पहिला ग्रुप ८ ते १३ मध्ये १२५, दुसरा ग्रुप १४ ते २१मध्ये १३० आणि तिसरा ग्रुप २२ वयापासून पुढे ४५ङ जणानी नोदणी केलेली आहे. तिन्ही ग्रुप मध्ये विजेत्यांना एकूण ३७ हजार रुपयांचे रोख पारितोषिक आणि प्रमाणपत्र, प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ दोन पुरस्कार या प्रमाणे देण्यात येणार आहे. महापौर समीर राजूरकर व उपायुक्त अंकुश पांढरे यांचे हस्ते बक्षीस वितरण होणार आहे. महानगर पालिका केंद्रीय प्राथमिक विद्यालय, प्रियदर्शनी, मयुरबन कॉलनी, गादिया विहार रोड, शहनुर्मिर्या दर्गा जवळ, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी हि स्पर्धा घेण्यात येत आहे. तरी सर्व विद्यार्थी, चित्रकार कलावंतांनी वेळेत उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक श्री सुनील रायसोनी, रायसोनी एज्युकेशनचे अध्यक्ष, श्री श्रेयस रायसोनी, कार्यकारी संचालक, डॉ. आर. डी. खराडेकर कुलगुरु, डॉ. अविनाश डी. काटे, डीन ऑफ संवेद स्कूल, विनोद काकडे अध्यक्ष, जिल्हा मराठी पत्रकार संघ, संजीव सोनार प्रशासन अधिकारी महानगरपालिका, किशोर निकम अध्यक्ष, औरंगाबाद फोटोग्राफी असोसिएशनस, आणि मनपा, पत्रकार संघ, एपीए तर्फे करण्यात आलेले आहे.

## गरीब विद्यार्थ्यांसाठी 'पालावरची अभ्यासिका' ठरत आहे शिक्षणाचा आधार

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान (महाराष्ट्र) यांच्या माध्यमातून सातारा परिसरातील बीड बायपास येथील मल्हार सेवा वस्तीत सुरू करण्यात आलेली 'पालावरची अभ्यासिका' सध्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा महत्त्वाचा आधार ठरत आहे. या अभ्यासिकेला स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी नुकतीच भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

या अभ्यासिकेत दररोज जवळपास ५० ते ६० विद्यार्थी शिक्षण घेत असून, हे सर्व विद्यार्थी व त्यांचे कुटुंबीय बाहेरील राज्यातून आलेले आहेत. आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही विद्यार्थ्यांनी शिक्षणाची जिद्द कायम ठेवली आहे.

यावेळी अनिल मकरिये यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी कोणतीही कमी पडू दिली जाणार नाही, असे आश्वासन दिले. तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत अभ्यासिकेत खिचडी व एक गोड पदार्थ सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना पोषणयुक्त आहार मिळण्यास मदत होणार आहे.

समाजातील वंचित आणि भटक्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सुरू असलेला हा उपक्रम अनेकांसाठी



प्रेरणादायी ठरत असून, स्थानिक नागरिकांकडून या कार्याचे कौतुक केले जात आहे.

यावेळी आरोग्य सभापती सुनिता साळुंखे, नगरसेविका सविता कुलकर्णी, नगरसेवक पद्मसींग राजपूत आदींची उपस्थिती होती.

### 'इंटर्नशिप'साठी 'माय भारत' पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.२७ (प्रतिनिधी)- भारत सरकारच्या प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेअंतर्गत युवकांना प्रत्यक्ष औद्योगिक संस्थांमधून इंटर्नशिपद्वारे कामाची संधी उपलब्ध करुन देण्यात येते. त्यासाठी युवकांनी माय भारत या पोर्टल वर नाव नोंदवावे. mybharat.gov.in या पोर्टलवर जाऊन ऑनलाईन नाव नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी श्रीमती मेघा सनवाल यांनी केले आहे.

# शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशी घसरण

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- पश्चिम आशियातील परस्परविरोधी भू-राजकीय संकेतांमुळे आणि परदेशी निधीचे पुन्हा सुरू झालेले निर्गमन यामुळे गुंतवणूकदारांनी सावधभूमिका बाळगल्याने, बुधवारी सलग दुसऱ्या दिवशी शेअर बाजार घसरणीसह बंद झाले. बकरी ईदच्या निमित्ताने गुरुवारी शेअर बाजार आणि परकीय चलन बाजारातील (फॉरेक्स) व्यवहार बंद राहतील. शुक्रवारी नेहमीप्रमाणे बाजारांमधील कामकाज सुरू होईल.

अस्थिर व्यवहारात, सेन्सेक्स १४१.९० अंशांनी घसरून ७५,८६७.८० अंशांवर स्थिरावला. दिवसभरात सेन्सेक्सने ७६,२२४.६८ अंशांचा उच्चांक आणि ७५,७४८.२१ अंशांचा नीचांक गाठला. दुसरीकडे निफ्टी ६.५५ अंशांच्या नगण्य घसरणीसह २३,९०७.१५ अंशांवर विसावला.

अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धविरामाबाबतच्या सततच्या चिंता आणि खनिज तेलाच्या वाढलेल्या किमती, यामुळे गुंतवणूकदारांचा कल सावध राहण्याकडेच राहिला. आखाती देशांमधील परस्परविरोधी भू-राजकीय संकेतांच्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी 'वाट पहा आणि परिस्थितीचा अंदाज घ्या (वेट अँड वॉच) असा पवित्रा घेतल्यामुळे, भारतीय शेअर बाजार बुधवारच्या सत्रात मर्यादित पातळीत व्यवहार करत बंद झाले, असे मत रेलिगेअर ब्रोकिंग लिमिटेडचे संशोधन विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष अजित मिश्रा यांनी व्यक्त केले.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये २९ व ३० मे रोजी 'जितो मॅन्युफॅक्चरिंग अँड इकोसिस्टम ग्रोथ समिट २०२६'

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) छत्रपती संभाजीनगर चॅप्टरच्या वतीने २९ व ३० मे २०२६ रोजी हॉटेल हयात प्लेस येथे 'जितो मॅन्युफॅक्चरिंग अँड इकोसिस्टम ग्रोथ समिट २०२६' या दोन दिवसीय भव्य शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. उद्योग, व्यापार, गुंतवणूक आणि नवोपक्रम क्षेत्रातील संधींचा वेध घेण्यासाठी तसेच विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना एकत्र आणण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेचे उद्घाटन जितो अपेक्सचे अध्यक्ष विजय भंडारी तसेच जितो रोम झोनचे अध्यक्ष राजेंद्र जैन यांच्या हस्ते होणार आहे. देशभरातील उद्योगपती, उद्योजक, गुंतवणूकदार, धोरणकर्ते, स्टार्टअप संस्थापक, व्यावसायिक आणि युवा उद्योजक या परिषदेत सहभागी होणार असून महाराष्ट्रासह विशेषतः मराठवाड्यातील औद्योगिक व आर्थिक विकासाच्या संधींवर सखोल चर्चा होणार आहे.

परिषदेमध्ये मॅन्युफॅक्चरिंग, इलेक्ट्रिक व्हेईकल (ईव्ही), इन्फ्रास्ट्रक्चर, रिअल इस्टेट, हॉस्पिटॅलिटी, वेअरहाउसिंग, लॉजिस्टिक्स, गुंतवणूक, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), शाश्वत विकास (सस्टेनेबिलिटी) आणि कौटुंबिक उद्योग (फॅमिली बिझनेस) या महत्त्वपूर्ण विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. उद्योग क्षेत्रातील सध्याची परिस्थिती आणि भविष्यातील संधी यांचाही उहापोह करण्यात येणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत कीनोट सत्रे, पॅनेल चर्चा, फायरसाईड चॅट, बिझनेस नेटवर्किंग सत्रे आणि इकोसिस्टम-केंद्रित संवाद आयोजित करण्यात येणार आहेत. यामुळे सहभागी उद्योजकांना उद्योगातील नव्या प्रवाहांची, गुंतवणुकीच्या संधींची आणि व्यवसाय विस्ताराच्या विविध पर्यायांची माहिती मिळणार आहे.

या परिषदेत अँथर एनर्जी, ओमेगा सेकी मोबिलिटी, ईवाय, कॉग्निझंट, नुवामा वेल्थ, कुशमन अँड वेकफिल्ड, बार्क, जेएलएल, अटेरो रीसायकलिंग यांसारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

परिषदेतील प्रमुख वक्त्यांमध्ये डॉ. उदय नारंग, स्वप्निल जैन, डॉ. बाबू पद्मनाभन, भावेश ठक्कर, रोहित चतुर्वेदी, राहुल जैन, विराट शाह, सनमती पाटील आणि जी. श्रीकांत यांचा समावेश असून विविध उद्योग संस्था व कॉर्पोरेट क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारीही आपले अनुभव आणि मार्गदर्शन सहभागींसोबत शेअर करणार आहेत.

(पान १ वरुन)

### राष्ट्रवादीच्या बैठकीत सुनील तटकरेंनी...

काही भूमिका घेणार आहे की नाही, असा सवाल सुनील तटकरे यांनी बैठकीत उपस्थित केला. तटकरे यांनी थेट पक्षनेतृत्त्वाला जाब विचारल्याने ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी तटकरेंना रोखण्याचा प्रयत्न केला. जे झालं ते झालं, आता त्यावर अधिक चर्चा न करता पुढे जाण्याची गरज आहे, असे भुजबळ यांनी म्हटले. मात्र, तटकरे यांनी भुजबळांच्या प्रयत्नाला न जुमानता आपले बोलणे सुरुच ठेवले. 'मी यावर बोलणार आणि याबाबत आता स्पष्टतता यायला हवी', असे सुनील तटकरे यांनी ठणकावून सांगितले.

या सगळ्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या बैठकीत एकप्रकारचा तणाव निर्माण झाला होता. विशेष म्हणजे सुनील तटकरे ज्यावेळी बोलण्यासाठी उभे राहिले त्यापूर्वीच पार्थ पवार हे तडकाफडकी बैठकीतून निघून गेले. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या बैठकीत सुनील तटकरे यांनी भूमिका मांडल्यानंतर एकाही आमदाराने पुढे बोलण्याचे धाडस केले नाही. यानंतर ही बैठक संपली.

### जनगणना कामावर असलेल्या महिला...

येथे भरधाव डंपरने त्यांच्या मोपेडला जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर मावळ तालुक्यातील शिक्षकांमध्ये संतापाची लाट उसळली असून शासकीय सुट्टीच्या दिवशीही जनगणनेच्या कामासाठी शिक्षकांना बोलावले जात असल्यावरुन संताप व्यक्त होत आहे. शिक्षकांना सुट्टीच्या दिवशीही जनगणना कामासाठी बोलवण्यावरुन प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. तसेच, शिक्षिका दीपाली तांबे यांच्या "अपघाती मृत्यूला जबाबदार कोण?" असा सवाल शिक्षकांकडून केला जात आहे. तर, महामार्गावर भरधाव डंपर वाहतुकीवर तातडीने निर्बंध आणण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

जनगणना करताना यापूर्वी राज्यातील तीन शिक्षकांचा मृत्यू झाला आहे. कोल्हापुरातील भगवान पाटील आणि सांगोला इथल्या राजाराम ढोले यांचा हृदयविकाराने, तर लातूर मधील सुंदरम वांगसकर यांचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या दुःखद घटनेनंतर त्यांचे कुटुंबीय उघड्यावर आले आहे. जनगणना करणाऱ्या प्रगणकांचा कर्तव्य बजावताना मृत्यू झाल्यास कुटुंबीयांस १० लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान द्यावे. तसेच कुटुंबीयांना अनुकंपाखाली नोकरी द्यावी अशी मागणी कोल्हापुरातील खाजगी प्राथमिक शिक्षक महासंघाने केली आहे. या बाबतचे निवेदन खाजगी प्राथमिक शिक्षक महासंघांचे अध्यक्ष राजेंद्र कोरे यांनी आजच कोल्हापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते.

### ऑनलाइन गेमिंग म्हणजे 'जुगार'च!

नाही. यासोबतच, खंडपीठाने तमिळनाडू आणि कर्नाटक राज्य सरकारांनी पैशांवर खेळल्या जाणाऱ्या ऑनलाइन खेळांवर घातलेल्या बंदीलाही कायदेशीररीत्या योग्य ठरवले आहे. यामध्ये रमी आणि पोकर सारख्या कौशल्याधारित मानल्या जाणाऱ्या खेळांचाही समावेश आहे.

यापूर्वी केंद्र सरकारने जीएसटी कायद्यात सुधारणा करून १ ऑक्टोबर २०२३ पासून सर्व परदेशी ऑनलाइन गेमिंग कंपन्यांसाठी भारतात नोंदणी करणे बंधनकारक केले होते. भारतीय वापरकर्त्यांकडून पैसे घेणाऱ्या परदेशी ॲप्सना कर रचनेच्या कक्षेत आणण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले होते. न्यायालयाच्या या ताज्या निकालानंतर आता देशांतर्गत आणि परदेशी अशा दोन्ही प्रकारच्या गेमिंग कंपन्यांना २८टक्के जीएसटीचा भरणा करणे अनिवार्य होणार आहे.

### केरळचे माजी सीएम पी. विजयन....

दिले. कोणतेही सॉफ्टवेअर किंवा आयटी सेवा न देता, हे पैसे बनावट खर्च म्हणून देण्यात आले असल्याचा आरोप आहे. हा खुलासा झाल्यानंतर, ईडीने पीएमएलए अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

या आरोपांची चौकशी करण्यासाठी ईडीने २०२४ मध्ये पीएमएलए अंतर्गत गुन्हा दाखल केला. हा मुद्दा विजयन सरकारसमोरील सर्वात राजकीयदृष्ट्या संवेदनशील वादांपैकी एक राहिला आहे. ईडीच्या तपासाव्यतिरिक्त, गंभीर फसवणूक तपास कार्यालय (एसएफआयओ) देखील या प्रकरणाचा तपास करत आहे.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**TENDER NOTICE**

The Executive Engineer JalnaDiv-II on behalf of MSEDCL invites Tender through e-tendering:- EE/JLN-II/TS/T-13/2026-2027 for work contract the work of transportation of failed transformer from Filter Unit Jalna Division II to various transformer repair agencies under Jalna Division II and vice versa and Opening of Dist. Transformer & Draining of oil of Capacity 3 ph 25/63/100/200/315 KVA and 1 ph 15/25 KVA amounting to Rs.5 Lakhs. The tender document will be available on website https://etender.mahadiscom.in/ from 28.05.2026 to 03.06.2026, the date of submission of tender is 03.06.2026 upto 18.00 hrs For details please visit our website etender.mahadiscom.in.

&

**TENDER NOTICE**

The Executive Engineer Jalna Div-II on behalf of MSEDCL invites Tender through e-tendering:- EE/JLN-II/TS/T-14/2026-2027 for work contract the work of transportation of Line Material/ poles transforemer/& other Materials from Major Store Ch. Sambhaji Nagar to Filter Unit Jalna Division-II & vice Versa under jalna Division- II & amounting of R. 5 Lakh. The tender document will be available on website https://etender.mahadiscom.in/ from dt.-28.05.2026 to 03.06.2026, the date of submission of tender is 03.06.2026 upto 18.00 hrs For details please visit our website etender.mahadiscom.in.

For immediate intimation please.

**PRO No. 44**

**Executive Engineer, MSEDCL Jalna Division-II**